मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १५८ ■ रविवार, १५ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




## पनवेल शहर पोलिसांची अवैधरित्या गावठी दारु निर्मितीच्या हातभट्टीवर कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल शहर पोलिसांनी अवैधरित्या गावठी दारु निर्मितीच्या हातभट्टीवर धडक कारवाई करून 16 बॅरल अंदाजे 3000 लीटर गावठी दारु जप्त केली आहे.पनवेल शहर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये कुंडेवहाळ येथील कोरीपासून पुढे सुमारे 3 किलोमीटर अंतरावर डोंगराच्या टोकावरील जंगल परिसरात अवैधरित्या गावठी दारू निर्मितीची हातभट्टी सुरू असल्याची गोपनीय माहिती पनवेल शहर पोलिसांना प्राप्त झाली होती. सदर माहितीच्या आधारे तात्काळ वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी कारवाई पथक तयार करून नमूद ठिकाणी छापा टाकण्यात आला. छाप्यामध्ये 16 बॅरल मधील अंदाजे 3000 लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली असून ती जागीच नष्ट करून दारू निर्मितीसाठी



वापरण्यात येणारे साहित्यही हस्तगत करण्यात आले आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. सदर कारवाई दारूबंदी अधिनियम कलम 65 (फ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आली असून वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रविण फडतरे, पोहवा अमोल पाटील, संदेश म्हात्रे, मिथुन भोसले, विशाल दुधे, सचिन कोर, किरण कराड आदींच्या पथकाने केली आहे.

## खांदा कॉलनीत पक्षाच्या विष्ठेचा नागरिकांना त्रास परिसरातील वाढलेल्या झाडांच्या फांद्या त्वरित तोडाव्यात - नगरसेविका सिताताई पाटील

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी वार्ताहर :** खांदा कॉलनी सेक्टर 6 परिसरात गार्डन परिसरात झाडाच्या फांद्या भरपूर वाढल्या असल्याने या परिसरात पक्षाचा वावर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे या पक्षाच्या विष्टा रस्त्यावर पडत असल्याने त्यांचा वासाचा त्रास तसेच पक्षाची विष्ठा फिरायला येणाऱ्या नागरिकांच्या अंगावर मोठ्या प्रमाणात पडत असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास होऊ लागला आहे झाडाच्या फांद्यांवर मोठ्या प्रमाणात बसलेल्या पक्षांमुळे हा त्रास वाढलेला आहे त्यामुळे या परिसरातील वाढलेल्या झाडांच्या फांद्या त्वरित तोडाव्यात जेणेकरून रस्त्यावर घाण होणार नाही व नागरिकांना होणारा त्रास कमी होईल त्यामुळे या परिसरातील झाडांच्या फांद्या त्वरित तोडाव्यात व नागरिकांना दिलासा द्याव्या अशी मागणी खांदा कॉलनीच्या नगरसेविका सिताताई पाटील यांनी पनवेल महापालिका प्रशासनाकडे एका पत्राद्वारे निवेदन देऊन केली आहे

# ‘विकसित नागपूर-२०४७’

## आराखड्याची कालबद्ध पद्धतीने अंमल-बजावणी होईल- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर :** विकसित भारत आणि महाराष्ट्राचे ध्येय डोळ्यापुढे ठेऊन तयार झालेला ‘विकसित नागपूर-२०४७’ हा दीर्घकालीन, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकास आराखडा हा केवळ दस्तऐवज राहणार नाही, तर राज्य सरकारच्या वतीने या आराखड्यातील प्रत्येक घटक आणि रणनीतीवर कालबद्ध पद्धतीने काम केले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) या संस्थेच्या वतीने नागपूर विभागाच्या शाश्वत विकासाच्या रणनीतीवर आधारित कार्यशाळेच्या समारोप सत्रात मुख्यमंत्री बोलत होते. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या सभागृहात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या मियो ओका तसेच ‘मित्रा’चे मुख्य कार्यकारी अधिकारी



प्रवीण परदेशी तसेच विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

विकसित नागपूरच्या या प्रवासाची सुरुवात या आराखड्याच्या निर्मितीसह होत आहे, याबद्दल समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्राचा आणि पर्यायाने नागपूर क्षेत्राचा विकास कुठल्या पद्धतीने व कोणत्या बाबींच्या प्राधान्यावर होणार याचा हा एक सुसंगत आराखडा आहे. त्यात कुठल्या क्षेत्रात आणि कुठल्या रणनीती वापराव्या लागतील, यावर व्यापक चर्चा झाली आहे. या व्हिजनच्या अंमलबजावणीची जबाबदारी मित्रा संस्थेकडे सोपविण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला ‘विकसित भारत-२०४७’ चे स्वप्न दिले आहे. त्यासाठी तीस ट्रिलियनच्या अर्थव्यवस्थेचे लक्ष्य बाळगले गेले आहे. त्यामुळे सर्वच क्षेत्र विकसित अर्थव्यवस्थेच्या मापदंडांमध्ये येतील. सुरुवातीला हे स्वप्न फार लांबचे वाटू शकते. आमच्याकडे केवळ दोन दशकांचा कालावधी आहे. एका बाजूला आव्हान आहे तर दुसऱ्या बाजुला मोठ्या प्रमाणात दिसणाऱ्या संधीही आहेत. या आराखड्याच्या माध्यमातून तयार झालेले ‘व्हिजन’ हे या दोन बाबींमधील पुलाची भूमिका बजावू शकते, याकडे मुख्यमंत्री फडणवीस लक्ष वेधले.

विकास आणि वाढ ही सर्वसमावेशक आणि न्याय्य असली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त करून मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्र ही भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे; मात्र, राज्यातील सुमारे पंचवीस जिल्हे या अर्थव्यवस्थेत अधिक मोठे योगदान देण्याची आकांक्षा बाळगून आहेत. प्रत्येक जिल्हा हा विकासाचे गतिमान केंद्र असायला हवा. प्रत्येक जिल्ह्यातील शक्तीस्थाने व संधींचा वापर करुन योग्य रणनीतीच्या माध्यमातून या जिल्ह्यांमधील आर्थिक आणि रोजगाराचे चित्र बदलता येईल. नागपूर हे केंद्र मानून सर्व सहा जिल्हे विकसित करण्याची ही संधी आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

मुख्यमंत्री म्हणाले, विकासाच्या आराखड्याची अंमलबजावणी करताना तंत्रज्ञानाचा वापर ‘फोर्स मल्टीप्लायर’ ठरेल. केंद्र सरकारचा गतीशक्ती प्लॅटफॉर्म हे त्याचे ठळक उदाहरण आहे. या प्लॅटफॉर्ममुळे पायाभूत सुविधाच्या योजना हाती घेताना त्यांचे नियोजन अतिशय सुलभ झाले आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

‘विकसित नागपूर-२०४७’ चा आराखडा पूर्ण विचारांती तयार झालेला असून तो अतिशय वास्तववादी आहे, असा अभिप्रायही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

## जि. प. बाळापुर च्या विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हात; बजाज फायनान्सचा स्तुत्य उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी: गिरमाजी सुर्यकार :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, बाळापूर येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत बजाज फायनान्सतर्फे गुणवंत व होतकरू विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शिक्षणाबाबत सकारात्मक प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बजाज फायनान्स धर्माबाद शाखेचे व्यवस्थापक गंगाधर तुकाराम सांगवे व सहाय्यक व्यवस्थापक रहेमान महबूब शेख उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक माधवराव वारले, श्यामला




पाटील मॅडम, मंदाताई पाटील मॅडम, वास्टर मॅडम, कोटगीरे मॅडम, जोशी मॅडम, वगदाळे मॅडम, चिलकेवार सर व कांबळे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवर व शिक्षकांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तरांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत नियमित अभ्यास करण्याचे, शिस्त पाळण्याचे व शाळेचे नाव उज्ज्वल करण्याचे आवाहन केले.

मुख्याध्यापक माधवराव वारले यांनी बजाज फायनान्सचे आभार व्यक्त करत सांगितले की, अशा उपक्रमांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळून त्यांच्या शिक्षणाला मोठी चालना मिळते आणि शाळेत शिकण्याची प्रेरणा वाढते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राम विठ्ठलराव चिलकेवार यांनी केले तर आभार प्रदर्शन राहुल मरीबा कांबळे यांनी केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान हेच या सामाजिक कार्याचे खरे यश ठरले.

## शिवरायांच्या विचारांनी नागपूर शहर शिवमय होणार; भाजयुमोतर्फे ९०० स्थानांवर जयंतीचे भव्य नियोजन!

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** अखंड भारताचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त नागपूर शहरात भारतीय जनता युवा मोर्चातर्फे १९ फेब्रुवारी ला भव्य कार्यक्रम करण्यात येणार आहेत.सर्वप्रथम सकाळी ९ वाजता महाल येथील छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या पुतळ्याला महानगर तर्फे माल्यार्पण करण्यात येईल.सोबतच शहरातील सर्व ६ विधान सभेमधील प्रत्येक प्रभागात आणि वॉर्डात मिळून जवळपास ९०० विविध स्थानांवर शिवजयंतीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्याचे नियोजन युवा मोर्चाने केले आहे.या संदर्भात भारतीय जनता पार्टीच्या महानगर कार्यालयात नुकतीच एक महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली.या यावेळी बोलतांना शहर अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी सांगितले की, "शिवरायांचे विचार घराघरात पोहोचवण्यासाठी यंदा शहराच्या कानाकोपऱ्यात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक विधानसभा निहाय, प्रभाग आणि वॉर्डासाठी स्वतंत्र योजना आखण्यात आली असून, स्थानिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जवळपास ९०० कार्यक्रम पार पडणार आहेत". या बैठकीला महानगरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठी उपस्थिती होती."संपूर्ण नागपूर शहर शिवमय करण्यासाठी युवा मोर्चाचे कार्यकर्ते सज्ज झाले असून,युवकांमध्ये या निमित्ताने मोठा उत्साह पाहायला मिळत आहे"असे युवा मोर्चा अध्यक्ष सचिन करारे यांनी सांगितले.बैठकीला मंचावर भाजप नागपूर महानगर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, महामंत्री संदीप जाधव,युवा मोर्चा अध्यक्ष सचिन करारे,महामंत्री रितेश पांडे, महामंत्री रिषभ अरखेल,युवती प्रमुख प्रशंसा भोयर,ईशान जैन व शशांक समुद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## भिमाबाई आंबेडकर यांची १७२ वी जयंती मेंडका येथे उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : प्रकाश गवारे/ता. मुदखेड (जि. नांदेड)** – भिमनगर, मेंडका येथील सम्राट अशोका बुद्ध विहार परिसरात भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घडविणाऱ्या मातोश्री भिमाबाई रामजी आंबेडकर यांच्या १७२ व्या जयंतीनिमित्त भव्य व उत्साहपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

ज्या मातेने भारतीय संविधान निर्मात्याला संस्कार, शिक्षणाची प्रेरणा आणि संघर्षाची शिकवण दिली, त्या भिमाई मातेला उपस्थितांनी कोटी कोटी नमन केले. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी भिमाबाई आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा आढावा घेत त्यांच्या त्याग, कष्ट आणि संस्कारमूल्यांची उजळणी केली.

“ज्या मातेने घडविले भारतीय घटनेच्या



शिल्पकाराला, त्या भिमाई मातेला कोटी कोटी नमन,” अशा भावपूर्ण शब्दांत अभिवादन करण्यात आले. समाजातील महिलांनी आणि तरुणांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत मातृत्व, शिक्षण आणि सामाजिक जाणीवेचा संदेश दिला.

यावेळी त्यागमूर्ती रमाबाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतीलाही अभिवादन करण्यात आले. मातोश्री भिमाबाई रामजी आंबेडकर व त्यागमूर्ती रमाई भीमराव आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी बुधवार रात्री ८:३० वाजता विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रम स्थळ :

सम्राट अशोका बुद्ध विहार, भिमनगर मेंडका, ता. मुदखेड, जि. नांदेड.

या संयुक्त जयंती सोहळ्यानिमित्त “बुद्ध-भीम गीतांचा” भव्य सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक प्रशांत दामोदर (यवतमाळ) व त्यांचा संच तसेच महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका अंजलीताई धांडके (लातूर) व त्यांचा संच आपली कला सादर करणार आहेत.

या कार्यक्रमाचे आयोजन समस्त बौद्ध उपासक-उपासिका व समाजबांधव, भिमनगर मेंडका (ता. मुदखेड, जि. नांदेड) यांच्या वतीने करण्यात आले असून, सर्व नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमास शोभा वाढवावी, अशी नम्र विनंती आयोजकांकडून करण्यात आली आहे.

## पनवेल, कामोठे व नावडेमध्ये महापालिकेच्या अतिक्रमण विभागाची तोडक कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** प्रभाग समिती - क कामोठेमध्ये कामोठ्यातील सेक्टर 21,22खांदा कॉलनी तसेच उपविभाग नावडे हद्दीतील तळोजे फेज - 2 येथील अनधिकृत झोपड्या, रस्त्यावरील अतिक्रमण तसेच फुटपाथवरील बेकायदेशीर चिकन विक्री शेड, फेरीवाले, अनधिकृत स्टॉल्स यांच्यावर तोडक कारवाई करण्यात आली. तसेच साहित्य जप्त करण्यात आले.

महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनूसार उपायुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती ‘क’ कामोठ्यातील सेक्टर 21,22 व खांदा कॉलनी येथील अनधिकृत झोपड्या, रस्ते तसेच फुटपाथवरील बेकायदेशीर शेड, हातगाड्या,भाजीवाले, फेरीवाले, अनधिकृत नर्सरी यांच्यावरती अधिक्षक दशरथ भंडारी यांच्या देखरेखीखाली अतिक्रमण विभागाच्यासाह्याने ही कारवाई केली.




याचबरोबर आज उपविभाग नावडे हद्दीतील तळोजे फेज - 2 येथील बेकायदेशीर झोपड्या, रस्ते तसेच फुटपाथवरील बेकायदेशीर चिकन विक्री शेड, फेरीवाले यांच्यावर अरविंद पाटील यांच्या देखरेखीखाली तोडक कारवाई करण्यात आली तसेच साहित्य जप्त करण्यात आले. तसेच नवीन पनवेलमध्ये गुरुवारी रेल्वे स्टेशन परिसरातील रस्त्यावरील अनधिकृत स्टॉल्स, दुकानांवरती अतिक्रमण विभागाच्या साह्याने तोडक कारवाई करण्यात आली. याचबरोबर आज प्रभाग समिती ड मधील पनवेल रेल्वे स्टेशन परिसरात अनधिकृत विक्रेत्यांवर व झोपड्यांवर कारवाई करण्यात आली.

# पिलीव यात्रेत श्री महालक्ष्मी देवीची रथा मधून भव्य मिरवणूक"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर):-** माळशिरस तालुक्यातील पिलीव या ठिकाणी ग्रामदैवत श्री महालक्ष्मी देवीची यात्रा माघ पौर्णिमेला सुरू होते. त्याप्रमाणे चालू वर्षीही यात्रा अतिशय मोठ्या प्रमाणात उत्साहात व भक्तिमय वातावरणात सुरू होऊन सर्व धार्मिक कार्यक्रम अतिशय उत्साहात झाले असून या यात्रेसाठी यात्रा ठिकाणी श्री महालक्ष्मी देवी, श्री जोतिबा देवस्थान, श्री म्हसोबा देवस्थान, श्री सिद्धनाथ देवस्थान त्याचप्रमाणे डोंगरावरती सुद्धा दर्शनासाठी भाविकांची बहुगर्दी झाल्याचे दिसून आले. श्री महालक्ष्मी देवीची रथातून मिरवणूक अतिशय भक्तिभावाने निघाली होती. यावेळी भाविक भक्तांनी दर्शनासाठी बहु गर्दी केली होती आणि श्री महालक्ष्मी देवीच्या नावानं चांगभलंचा जयघोष मोठ्या प्रमाणात निनादत होता. यात्रेमध्ये करमणुकीची त्याचप्रमाणे शेतकरी बांधवांच्या शेती अवजारांची तसेच शेळ्या मेंढ्या स्टेशनरी दुकाने हॉटेल्स पाळणे या सर्वांना खरेदी-विक्री चांगल्या प्रमाणे



झाल्याचे समजते. या यात्रेमध्ये यात्रेकरूंना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सद्गुरु श्री श्री साखर कारखाना श्रीनगर राजेवाडी आणि कृषी उत्पन्न बाजार समिती अकलूज यांच्या वतीने सुरळीत झाल्याचे बोलले जात आहे. यात्रा कमिटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ, त्याचप्रमाणे तेथील मंदिरांचे सर्व पुजारी मानकरी यांनीही भाविक भक्तांना मोलाचे सहकार्य केल्याचे दिसून आले.

# लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा अपमान : अधिकाऱ्यांच्या उद्धट वर्तनावर कारवाई होणार का?

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी/ करण धोंगडे** : लोकशाही व्यवस्थेत पत्रकारिता ही जनतेचा आवाज मानली जाते. मात्र, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग–वाशिम येथे घडलेली घटना प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारी ठरली आहे. माहिती घेण्यासाठी गेलेल्या पत्रकाराला अधिकाऱ्यांकडून उडवाउडवीची उत्तरे देत असभ्य वागणूक दिल्याचा प्रकार समोर आला असून यामुळे पत्रकारितेच्या सन्मानावरच गदा आल्याची भावना व्यक्त होत आहे.

दैनिक चालू वार्ताचे जिल्हा प्रतिनिधी प्रताप नागरे हे जिल्हा परिषद कार्यालयाबाहेर सुरू असलेल्या उपोषणासंदर्भात जल जीवन मिशन योजनेच्या अंमलबजावणीबाबत माहिती घेण्यासाठी कार्यालयात गेले होते. मात्र, कार्यालयात कोणताही







अधिकारी शासनाच्या परिपत्रकानुसार ओळखपत्रासह उपस्थित नसल्याचे दिसून आले. उपोषणाच्या पार्श्वभूमीवर जल जीवन मिशन योजनेची सद्यस्थिती काय आहे, याबाबत विचारणा केली असता संबंधित अधिकाऱ्यांनी "आमच्याकडे कोणतीही माहिती नाही" असे सांगत स्पष्ट माहिती देण्याचे टाळले.

याचबरोबर संपर्कासाठी मोबाईल क्रमांक मागितल्यावर "आम्ही कोणत्याही पत्रकाराला नंबर देत नाही" असे सांगण्यात आले. तसेच कार्यालयाचा अधिकृत संपर्क क्रमांक विचारला असता "आमच्याकडे ऑफिसचा नंबर उपलब्ध नाही, नंबर मागू नका" अशी असभ्य भाषा वापरल्याचेही समोर आले आहे. शासकीय कार्यालयात अशी भूमिका घेतली जात असेल, तर सामान्य नागरिकांना माहिती मिळवताना किती अडचणींना सामोरे जावे लागत असेल, हा गंभीर प्रश्न यानिमित्ताने निर्माण झाला आहे.

शासकीय अधिकारी हे लोकसेवक असतात, तर पत्रकार हे जनतेचे प्रतिनिधी असतात. त्यामुळे पत्रकारांना माहिती देण्याऐवजी उद्धट वर्तन करणे, माहिती नाकारणे व संपर्क टाळण्याची भूमिका घेणे ही अत्यंत निंदनीय बाब आहे. संबंधित कार्यकारी अभियंता व जबाबदार अधिकाऱ्यांना वरिष्ठांनी तात्काळ समज देत आवश्यक ती शिस्तभंगाची कारवाई करावी, अशी जोरदार मागणी पत्रकार व नागरिकांमधून होत आहे.

**पत्रकाराचा अपमान म्हणजे लोकशाहीचा अपमान!**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वाशिम येथील अधिकाऱ्यांनी केलेले उद्धट वर्तन निंदनीय असून वरिष्ठांनी तात्काळ कारवाई करावी.शासकीय कार्यालयात माहिती नाकारून व संपर्क क्रमांक देण्यास नकार देणे हे लोकसेवकाला शोभणारे नाही. प्रशासनाने याची गंभीर दखल घेणे आवश्यक आहे.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या संदर्भाने क्षेत्रीय समितीची आढावा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी/गेवराई भीमराव गावडे :** मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेच्या संदर्भाने गेवराई विधानसभा क्षेत्रीय समितीची आढावा बैठकला गेवराई विधानसभेचे आमदार मा. श्री विजयराजे पंडित यांच्या उपस्थितीत योजनेच्या प्रभावी अंमलजावणी संदर्भात तपशिलाने चर्चा केली. बैठकीत माजी आमदार तथा जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री. अमरसिंह पंडित साहेब यांनी मार्गदर्शन केले.



महायुती सरकारने शेत रस्त्याच्या संदर्भात मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते ही अतिशय प्रभावी योजना सुरु केली आहे. या योजनेत रोहयोसह इतर योजनेत मंजुर असलेली रस्त्यांच्या कामाशिवाय इतर कामे उदा. शिव रस्ते, नकाशावरील अस्तित्वातील रस्ते, शेत रस्ते, पांदन रस्ते आदींना प्राधान्याने मंजुरी दिली जाणार आहे. आज झालेल्या बैठकीत प्राथमिक चर्चा करण्यात आली.

गेवराई विधानसभा मतदार संघातील सर्व ग्रामपंचायतींनी आपआपल्या कार्यक्षेत्रातील रस्त्यांच्या कामांचे रितसर प्रस्ताव तहसिल कार्यालयात दाखल करावेत असे आवाहन यानिमित्ताने केले, तसे लेखी पत्र या समितीच्या आजच्या बैठकीच्या निमित्ताने निर्गमित करावेत अशा सूचना केल्या आहेत.उपविभागीय अधिकारी श्रीमती कविता जाधव, तहसिलदार, गेवराई, श्री. संदिप खोमणे, तहसिलदार, बीड श्री. चंद्रकांत शेळके, तहसिलदार, माजलगाव श्री. संतोष रुईकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके, गटविकास अधिकारी श्री. अनिरुद्ध सानप, गेवराई तालुका कृषी अधिकारी श्री. सचिन गिरी, माजलगाव तालुका कृषी अधिकारी श्री. जी.बी. बादाडे, उपविभागीय अभियंता श्री. एस.एस. चोपडे, व्ही.बी.धोंगडे, भुमि अभिलेख कार्यालयाचे प्रतिनिधी आर. बी. गवळी यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शेलुबाजारमध्ये धडक कारवाई; २ किलो ३५ ग्रॅम गांजा जप्त, एकास अटक!

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे/वाशिम जिल्हा प्रतिनिधी :** तालुक्यातील शेलुबाजार येथे मंगरुळपीर पोलिसांनी धाडसी कारवाई करत तब्बल २ किलो ३५ ग्रॅम गांजा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या अमली पदार्थाची अंदाजे किंमत सुमारे ₹४०,००० इतकी असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. या प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या गुप्त माहितीनुसार मंगरुळपीर पोलिसांनी सापळा रचून




संशयितास ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडून गांजाचा साठा आढळून आला. संपूर्ण मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला असून संबंधित आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या कारवाईमुळे मंगरुळपीर तालुक्यात अमली पदार्थांच्या अवैध विक्रीला मोठा आळा बसणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पोलिसांच्या या तत्परतेबद्दल स्थानिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

**अमली पदार्थांच्या व्यवहारात सहभागी असणाऱ्यांवर मंगरुळपीर पोलिसांकडून कठोर कारवाई करण्यात येणार असून तालुक्यात सातत्याने विशेष तपास मोहिमा राबविण्यात येत आहेत. गुप्त माहितीच्या आधारे अचूक सापळे रचून गुन्हेगारांना जेरबंद केले जात आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी २४ तास सतर्क यंत्रणा कार्यरत आहे. नागरिकांनी संशयास्पद हालचालींची माहिती त्वरित मंगरुळपीर पोलिसांना द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.**

**– मंगरुळपीर पोलीस**

**मंगरुळपीर पोलिसांचा इशारा :**

"अमली पदार्थांच्या व्यवहारात सहभागी असणाऱ्यांना कुठलीही सवलत दिली जाणार नाही. कायदा व सुव्यवस्था राखणे हीच आमची प्राथमिकता आहे."मंगरुळपीर पोलिसांची ही धडक कारवाई गुन्हेगारीविरोधातील कठोर भूमिकेचे द्योतक मानली जात आहे.

# प्रवासी महिलेवर चाकूने हल्ला करुन तिला लुटणाऱ्या ऑटो रिक्षा चालकाला अटक, कर्ज फेडण्यासाठी केले कृत्य

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी** : रिक्षेत बसलेल्या प्रवासी महिलेवर चाकूने प्राणघातक हल्ला करून तिला लुटणाऱ्या ऑटो रिक्षा चालकाला पनवेल शहर पोलिसांनी 48 तासाच्या आत अटक केली. यावेळी कर्ज फेडण्यासाठी आरोपीने हे कृत्य केले असल्याची कबुली पोलिसांकडे दिली. पोलिसांनी चोरीला गेलेला मुद्देमाल आणि रिक्षा जप्त केली. अक्षय एकनाथ बागडे (रा. करंजाडे, सेक्टर आर थ्री) असे आरोपीचे नाव आहे.

11 फेब्रुवारी रोजी सायंकाळच्या सुमारास संगीता भोईर या ऑटो रिक्षाने घरी जात असताना रिक्षा चालकाने प्रवासी महिलेला रिक्षा बंद पडली आहे असे सांगून तिच्या गळ्यावर, छातीवर आणि पायावर चाकूने वार केले. यात ती गंभीर जखमी झाली. यावेळी तिच्याकडील सोन्याचे मंगळसूत्र, चैन मोबाईल आणि रोख रक्कम



घेऊन रिक्षा चालक पळून गेला. पनवेल शहर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यानंतर त्यांना रिक्षाचे शेवटच्या चार आकड्यांबाबत माहिती मिळाली. पोलिसांनी इतर रिक्षा चालकांकडे विचारपूस केली. यावेळी एम एच 04 एलएक्स 46 19 यावरील ऑटो रिक्षा चालक अक्षय एकनाथ बागडे (वय 27 ) याला ताब्यात घेतले. त्याने सदरचा गुन्हा केल्याचे कबूल केले. यावेळी त्याने घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी हे कृत्य केल्याचे सांगितले. यावेळी त्याच्याकडून सोन्याचे मंगळसूत्र आणि ऑटो रिक्षा जप्त केली. यातील जखमी महिलेवर पनवेल येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# पनवेल महापालिका महापौर नितीनजी पाटील यांची सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**
**प्रसाद हनुमंते** : नितीन जयराम पाटील यांची पनवेल महापालिकेच्या महापौरपदी निवड झाल्यानंतर विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. याच पार्श्वभूमीवर प्रसिद्ध व्यावसायिक जयेश मेहता, दीपक मिराणी, गणेश भगत, कल्पेश ठक्कर, सोशल मीडिया हेड तथा कास्टिंग डायरेक्टर प्रसाद हनुमंते आणि रिफ्लेक्शन थिएटर चे व्यवस्थापक मृण्मय काणे यांनी महापौरांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना पुष्पगुच्छ देत पुढील कार्यकाळासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.या वेळी उपस्थित मान्यवरांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महापौरांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये विविध विकासकामांना गती मिळेल,



असा विश्वास व्यक्त केला. सांस्कृतिक, सामाजिक आणि व्यावसायिक क्षेत्रातील प्रतिनिधींनी दिलेल्या या शुभेच्छांमुळे महापौरांच्या कार्याला अधिक बळ मिळणार असल्याचे मतही व्यक्त करण्यात आले.महापौर नितीनजी पाटील यांनी सर्वांचे आभार मानत पनवेल शहराच्या प्रगतीसाठी सर्व घटकांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# दलितांच्या व्यथा,वेदना साहित्यातून अभिव्यक्त करत विद्रोह पेरणारा विद्रोही बंडखोर - पद्मश्री नामदेव ढसाळ


दलित अन्याय अत्याचाराची मालिका खंडित होत नाही
स्वातंत्र्य नावाची रंडी इथं कधी नांदत नाही
मुकी बहिरी झाली ही वांझ व्यवस्था
आक्रोश हिला आमचा दिसत नाही

अश्या प्रखर शब्दात व्यवस्थेवर घणाघाती प्रहार करत विद्रोही बाण्याने व्यवस्थेला फाट्यावर कोलणारे विद्रोही बंडखोर,वेदना आणि विद्रोहाचे स्फूल्लिंग चेतवणारे आंबेडकरी विचारवंत,मराठी साहित्य विश्वात दलित साहित्याला नवी दिशा देत परिवर्तन घडवणारे, परिवर्तनवादी प्रातिभीक सामर्थ्य लाभलेले जेष्ठ साहित्यिक,दलित चळवळ बुलंद करण्यासाठी " दलित पँथर " ही विद्रोही सामाजिक संघटना संस्थापित करणारे,महानगरीय जीवनावर लिहिणारे बोली भाषेत लिखाण करणारे मराठीतील एक महत्वाचे लेखक,आपल्या शब्दांनी प्रस्थापितांच्या सत्तेला हादरा देणारे बौद्ध दलित चळवळीतील क्रांतिकारी सूर्य म्हणजे पद्मश्री नामदेव लक्ष्मण ढसाळ होत.

नामदेव ढसाळ दलित चळवळीतील एक अग्रगण्य नाव.ज्यांनी दलितांच्या व्यथा वेदना जाणल्या.नुसत्याच त्या जाणल्या नाही तर आपल्या लेखणीतून,साहित्यातून त्या व्यथा वेदना सर्वांसमोर मांडत त्याला न्याय मिळावा यासाठी त्यांनी तितक्यात ताकतीने लढा उभारला.नामदेव ढसाळ यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९४९ रोजी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात झाला.ढसाळ यांनी साहित्यातून अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य केले.त्यांच्यावर महामानव,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच शांती आणि करूणेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांचा प्रभाव होता.

नामदेव ढसाळ यांना त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे.त्यांच्या " गोलपिठा " या साहित्यकृतिस महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला आहे.सोव्हीयत लँड नेहरू पुरस्कार, महाराष्ट्र राज्य कवी केशवसुत पुरस्कार,१९९९ मध्ये पद्मश्री पुरस्कार, बहिणाबाई चौधरी पुरस्कार, २००५ रोजी साहित्य अकादमी स्वर्ण महोत्सव निमित्त जीवनगौरव पुरस्कार,२००६ रोजी गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार, बुद्ध रोहिदास विचार गौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.पद्मश्री नामदेव ढसाळ यांनी साहित्य क्षेत्रातील योगदान वाखानण्याजोगे आहे. त्यांनी १९७२ साली त्यांचा पहिला कवितासंग्रह " गोलपीठा " प्रकाशित केला.यात त्यांनी विद्रोही बंडखोरी करत व्यवस्थेविरोधात शब्दाशब्दातुन चपराक सडकवला. त्यानंतर त्यांनी आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र -प्रियदर्शनी,खेळ,तुही इयत्ता कंची, तुझे बोट धरून चाललो आहे,मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे,गांडू बगीचा, या सत्तेत जीव रमत नाही,मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले,मी भयंकराच्या दरवाज्यात उभा आहे व निर्वाणा अगोदरची पिडा असे कवितासंग्रह प्रसिद्ध केले. याच बरोबर त्यांनी निगेटिव्ह स्पेस,उजेडाची काळी दुनिया व हाडकी हडवळा या तीन कादंबऱ्या देखील लिहिल्या आहेत.' अंधार यात्रा ' हे नाटक देखील त्यांनी लिहिलेले आहे.तसेच बुद्ध धर्म काही शेष प्रश्न,आंबेडकरी चळवळ,आंधळे शतक सर्व काही समष्टीसाठी असे चिंतनपर लेख ही लिहिलेले आहेत. नामदेव ढसाळ यांच्या मृत्युंनंतर त्यांचे " दलित पँथर - एक संघर्ष " हे चिंतनपर लेखन २०१४ साली प्रकाशित करण्यात आले.

१९७२ मध्ये त्यांनी चळवळीत काम करत असताना दलित चळवळीतील समवयस्क सहकारी तसेच साहित्यिकांच्या साथीने " दलित पँथर " या आक्रमक संघटनेची स्थापना केली.त्यांच्या या चळवळीवर अमेरिकेतील ब्लॅक पँथर या चळवळीचा मोठा प्रभाव होता.यां संघटनेतुन त्यांनी दलितांच्या प्रश्नांना, अन्याय अत्याचाला वाचा फोडली,दलितांच्या अनेक प्रश्नासाठी उग्र आंदोलने केली.त्यावेळेस च्या



सरकारला दलित हिताचे निर्णय घेण्यासाठी त्यांनी प्रवृत्त केले.मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यातही त्यांचे मोलाचे योगदान आहे.

तोंड वाजवून न्याय मिळत नसेल तर तोंडात वाजवून न्याय मिळवायचा.माझ्या संघटनेत काम करायचे असेल तर चळवळीत काम करायचं असेल तर मन घट्ट करावे लागेल.मार खायला शिकलं पाहिजे. संघटनेत नीट काम केलं नाही ना तर गांडीवर लात मारून काढून देईन.समाजासाठी काम करता येत नसेल तर चोरी मारी,दरोडेखोरी, बलात्कारी सोडून बाकीचे जे काही पोटापाण्याचे धंदे आहेत ते करा.पैसे मिळवण्याचा धंदा करावा.आणि काही जमलं नाही तर मटका बुकी चा धंदा करा,दारू विका.कोण पोलीस येतो,काय करतो यासाठी मी तुमच्या पाठीमागे आहे.असे आपल्या कार्यकर्त्यांना ते म्हणायचे.बाबासाहेबाचं नाव घ्यायचं, फुलेंचं नाव घ्यायचं आणि आपली पोटाची खळगी भरायची हे धंदे सोडून द्या. असे ते कार्यकर्त्यांना स्पष्टपणे सांगायचे.

अश्या या गरीब,शोषितांचा अन्याय अत्याचाराला आपल्या लेखणीतून वाचा फोडत त्याविरोधात लढणाऱ्या योध्याचा अंत वयाच्या ६४ व्या वर्षी १५ जानेवारी २०१४ रोजी झाला. त्यांच्या जाण्याने आंबेडकरी चळवळीचे आणि दलित पँथर चे न भरून निघणारे नुकसान झालेले आहे. आजही दलित पँथर ही सामाजिक संघटना त्यांना सांगितलेल्या तत्वावर कार्य करत आहे.त्यांचा लढा प्रत्येक ठिकाणी त्यांच्याच पद्धतीने हाताळत आहेत.खऱ्या अर्थाने नामदेव ढसाळ यांनी जाता जाता विद्रोहाची ज्वाला येणाऱ्या पिढीत पेटवली.अन आता अनेक कवी, लेखक, सामाजिक कार्यकर्ते त्यांची प्रेरणा घेऊन अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य करत आहेत.

अन्याय अत्याचाराची चिड होता नामदेव
सामाजिक लढ्याची लीड होता नामदेव
छिनाल व्यवस्थेला फाट्यावर कोलणारा
आंबेडकरी चळवळीची ग्रीड होता नामदेव

**- विजय नारायण वाठोरे, नांदेड**
**तालुकाअध्यक्ष - दलित पँथर (नामदेव ढसाळ)**

# 'श्री गुरुदेव हरिहर भगवंत कृपेने वारकरी भक्तांच्या सहकार्य व सहभागाने पिलीव पंचमठ क्षेत्र ते शिवक्षेत्र वेळापूर महाशिवरात्रीनिमित्त हरिहर पालखी रथ दिंडी सोहळा"

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर):** महाशिवरात्री निमित्त पिलीव व परिसरातील अनेक भाविक भक्तांचे श्रद्धास्थान गुरुभक्त मूर्ती हरिहर नंदन उर्फ रवींद्र महाराज करमाळकर यांच्या नियोजनातून आणि श्री गुरुदेव हरिहर भगवंत कृपेने वारकरी भक्तांच्या सहकार्य व सहभागाने पंचमठ क्षेत्र ते शिवक्षेत्र वेळापूर पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सदरचा दिंडी सोहळा दि.१२/२/२६ ते१६/२/२६ असा असून सुळेवाडी हरिहरगडा पासून प्रारंभ होऊन पहिला मुक्काम पिलीव येथील पंचमठ क्षेत्र तर दुसरा मुक्काम निमगाव (म) आणि त्यानंतर श्रीक्षेत्र महादेव मंदिर (अर्धनारी नटेश्वर मंदिर) वेळापूर या ठिकाणी अमावास्येपर्यंत दिंडीचा मुक्काम असणार आहे. या कालावधीत श्री शिवमंगल भूपाळी, काकड आरती, स्तोत्रपठण, श्री शिवलिंग महापूजा अभिषेक, नगर दिंडी प्रदक्षिणा सोहळा, श्री शिवलीलामृत ग्रंथ पारायण,श्री शिव भजन ,सामुदायिक श्री शिवनाम संकीर्तन गुरु भक्त मूर्ती हरिहर नंदन यांचे अमृतवाणीतून व श्री शिव सहस्त्रनामाने लिंग बिल्वार्चन भजन, आरती



असे कार्यक्रमाचे आयोजन असून दि १६ रोजी काला व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार असल्याचे संयोजकांनी सांगितले. सदर हरिहरपालखी रथ दिंडी सोहळ्याचे सुळेवाडी, पिलीव, झिंजेवस्ती, लक्ष्मीनगर, कुसमोड, निमगाव ( म), शेरी व वेळापूर येथील ग्रामस्थांनी भक्तिमय वातावरणात स्वागत केले. सदर दिंडी सोहळ्यात असंख्य भाविक भक्त मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्याचे दिसून आले.

# येस बँक वसुलीविरोधात संतोष सुरवडकर यांचे जागरण गोंधळ आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड /(पिंपळगाव बसवंत) :** शेतकरी सरपंचाच्या ट्रॅक्टर जप्तीप्रकरणी संताप उसळला पिंपळगाव बसवंत निर्भय महाराष्ट्र पार्टीचे निफाड तालुका अध्यक्ष संतोष सुरवडकर यांच्या नेतृत्वाखाली येस बँक च्या कथित बेकायदेशीर वसुली आणि गुंडगिरीविरोधात जागरण गोंधळ घालत तीव्र आंदोलन करण्यात आले. शेतकरी सरपंचाच्या घरात घुसून ट्रॅक्टर व त्यासोबत असलेला दीड लाख रुपयांचा रोटावेटर बेकायदेशीररीत्या पळवून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल



झाल्यानंतर स्थानिक पातळीवर मोठा संताप व्यक्त होत आहे.

सदर घटना देवळा तालुका परिसरातील असल्याचे सांगितले जात असून, शेतकरी सरपंचाचा फक्त एक हप्ता थकलेला असतानाही वसुली माफिया टोळीने घरात घुसून ट्रॅक्टर शेडचे कुलूप तोडल्याचा आरोप आहे. ट्रॅक्टरवरील कर्ज फक्त मशीनवर असतानाही संपूर्ण ट्रॅक्टर आणि रोटावेटर जप्त केल्याने बेकायदेशीर वसुलीचा गंभीर मुद्दा समोर आला आहे. शिवाय भरलेली रक्कम बँकेच्या खात्यावर न दिसता डमी अकाउंटमध्ये वळवल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.या घटनेनंतर पीडित शेतकरी सरपंचांनी मदतीसाठी निर्भय महाराष्ट्र पार्टी यांच्याशी संपर्क साधला. पक्षाची टीम काही तासांत गावात दाखल झाली आणि बँक अधिकाऱ्यांशी चर्चा केली. मात्र चर्चा निष्फळ ठरल्याने आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. या प्रकारामुळे बँकिंग क्षेत्रात वसुलीसाठी गुंडगिरीचा वापर वाढत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट भूमिका घेत सांगितले की कर्ज फेडणे हे कर्जदाराचे कर्तव्य आहे, परंतु वसुली करताना कायद्याचे उल्लंघन होऊ नये. वसुली प्रक्रिया ही भारतीय रिझर्व्ह बँक च्या मार्गदर्शक सूचनांनुसार आणि देशाच्या कायद्याच्या चौकटीतच व्हावी, अन्यथा अशा घटना कर्जदारांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम करून गंभीर परिणाम घडवू शकतात.या संपूर्ण प्रकरणात बेकायदेशीर वसुली पद्धतीचा तीव्र निषेध करण्यात आला असून शासनाने तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. चोरीचा गुन्हा दाखल झाल्याने ट्रॅक्टर जप्ती प्रकरण आता बँक आणि संबंधित वसुली टोळयांच्या अडचणीत भर घालणार असल्याचे सांगितले जात आहे.

सर्वसामान्य नागरिकांचा प्रश्न आहे — आता तरी शासन वसुलीतील गुंडगिरीविरोधात कठोर कारवाई करणार का?

# यासेर उर्दु प्राथमिक शाळेतर्फे तालुकास्तरीय गौरव रंगभरण स्पर्धा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी/शिवाजी पवार :** गौरव सेवाभावी संस्था द्वारा संचलित यासेर उर्दु प्राथमिक शाळा सेलू तर्फे आयोजित द्वितीय रंगभरण स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. आज दिनांक 14 फेब्रुवारी 2026 तालुकास्तरीय भव्य रंगभरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेत संपूर्ण सेलू तालुक्यातील उर्दू आणि मराठी माध्यम शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला. या स्पर्धेत फातेमा उर्दू प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद उर्दू शाळा, यासेर उर्दु पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक शाळा, डॉ.अब्दुल कलाम उर्दू शाळा वालूर, ज्ञानदीप प्राथमिक शाळा वालूर, वाल्मिकेश्वर माध्यमिक विद्यालय वालूर, शांताबाई नखाते आश्रमशाळा वालूर, जिल्हा परिषद उर्दू शाळा वालूर, शैलेजा उर्दू प्राथमिक



शाळा सेलू, खान अब्दुल गफ्फार खान उर्दू माध्यमिक शाळा सेलू इत्यादी शाळांनी सहभाग नोंदवला.

या रंगभरण स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष रहीम खान खैरूल्ला खान पठाण आणि केंद्रप्रमुख विजय चिकटे व यासेर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक पठाण जावेद खान फेरोज खान, माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका कासमी मॅडम यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेत सर्व शाळेतील एकूण 770 विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.या स्पर्धेच्या यशस्वितेसाठी सय्यद इम्रान, तहमीना खान, सय्यद अजीम, नजमा पठान, मानवीय हाशमी, शेख साजिद, सय्यद अमन, सिमा पठान, नफीसा बाजी आदींनी परिश्रम घेतले.

# प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय केंद्र उमरी येथे महाशिवरात्री निमीत्त शिवपुजन ध्वजारोहन श्री.माधुरी बहेनजी यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार ग.श्रीरामवार** : उमरी महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय केंद्र आनंदीबाई नगर उमरी येथे श्री.शिवबाबांचे मंत्रोउच्चारात पुजाअर्चना करण्यात आले व केंद्राच्या प्रांरगणात ब्रह्माकुमारी ईश्वरीय श्री.माधुरी बहेनजी यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तदनंतर बहिणजी यांच्या वतीने उपस्थित सर्वांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा देत महाशिवरात्रीचे महत्व सांगण्यात आले.

आपण आपल्या जीवनामध्ये आचरण कसे





असावे, एक दिवसीय ईश्वरी पूजन नकरता रोज जर ईश्वराची आपण कुठल्याही प्रकारची इच्छा ,आकांक्षा स्वार्थ नबाळगता ईश्वराची पूजा केल्या नंतर निश्चितच आपण सदमार्गास लागू. रोजच्या जीवनामध्ये आपले दैनंदिन कार्य करून ईश्वर भक्ती करावी असे म्हणत उपस्थित सर्वांना महाशिवरात्रीच्या शुभेच्छा देण्यात आल्या याप्रसंगी उपस्थित श्री.गोविंदराव राठोड माजी आयुक्त, सहपत्नीक सौ.अर्चनाताई राठोड, हैदराबाद डिव्हिजनल डीआरयुसीसी मेंबर श्री.पारस दर्डा,

ज्येष्ठ नागरिक श्री.पंडितराव पा.बेंबरे , मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठान चे अध्यक्ष श्री.रुपेशकुमार श्रीरामवार, प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेचे नांदेड जिल्हाध्यक्ष श्री.पंढरीनाथ पा.हुंडेकर आदी अनेक जणांची यावेळी विशेष उपस्थिती होती.

# नगरसेवक पदी निवड झाल्याबद्दल सुनील शेठ भंडारी यांचा मिरजगाववासियातर्फे सत्कार

**दैनिक युवक आधार**

**सतीश शिंदे/मिरजगाव प्रतिनिधी :** नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीमध्ये मिरजगाव चे भूमिपुत्र सुनील शेठ उर्फ गोटू भंडारी यांची राज्याचे सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा नगरपरिषद मध्ये स्वीकृत नगरसेवक म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली नगरसेवक पदी त्यांची निवड होताच मिरजगाव आणि परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले या निवडीबद्दल मिरजगाव व परिसरातील त्यांच्या मित्रमंडळींनी मिरजगाव येथे त्यांचा जाहीर सत्कार केला, पक्षाशी एकनिष्ठ आणि जनमानसात चांगले काम केल्याबद्दल मला हे नगरसेवक पद राज्यमंत्री यांच्या आशीर्वादामुळे मिळाले असे गोटू शेठ भंडारी यांनी सांगितले



सदर कार्यक्रमास माजी पंचायत समिती सदस्य तथा भावी पंचायत समिती सदस्य डॉक्टर पंढरीनाथ गोरे, भाजपा शहर अध्यक्ष संजय शेलार, ग्रामपंचायत सदस्य सचिन कोरडे, माजी सरपंच काशिश्वर बुद्धिवंत तसेच मिरजगांव मधील त्यांचा मित्रपरिवार मोठया संख्येने उपस्थित होता, माझ्यावर टाकलेली जबाबदारी मी उत्कृष्टपणे पार पाडून सातारा नगरीतील जनसामान्यांची कामे मार्गी लावेल असे नवनिर्वाचित नगरसेवक श्री. सुनील शेठ भंडारी यांनी सांगितले.

# सेलूत भव्य शिवजन्मोत्सव सोहळा व मिरवणूकीचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी/शिवाजी पवार** : श्रीशिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती सेलू तालुका यांच्या वतीने भव्य शिवजन्मोत्सव सोहळा २०२६ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.दिनांक १९ फेब्रुवारी



२०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज स्मारक (शिवतीर्थ), सेलू शहर येथून मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. ढोल-ताशा पथक, लेझीम पथक, पारंपरिक वेशभूषा, आकर्षक देखावे आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी मिरवणूक दिमाखात पार पडणार आहे. मिरवणुकीनंतर महाआरती व भव्य आतिषबाजीने शिवजन्मोत्सवाची सांगता होणार आहे.

शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळा यशस्वी करावा, असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.शिवभक्तीचा जागर आणि स्वराज्याच्या विचारांची प्रेरणा देणारा हा सोहळा सेलू शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण करणार आहे.

# विजय तटकरी यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दैनिक किल्ले रायगडचे संपादक प्रमोद वालेकर यांचे जावई उद्योजक तुषार तटकरी यांचे वडील विजय धोंडू तटकरी यांचे शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी मुबईतील जे. जे. रुग्णालयात अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, अशा विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक उपस्थित होते.कै. तटकरी हे शांत, मनमिळावू व सामाजिक जाणीव असलेले



व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी आपल्या आयुष्यात समाजातील विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदविला होता. त्यांच्या निधनामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे व आप्तेष्ट असा परिवार आहे.

# शिवजयंती निमित्त भाजपच्या वतीने मराठा वेशभूषा स्पर्धा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक १९ च्या वतीने गुरुवार दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती शोभायात्रा निमित्त पनवेल महानरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठा वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

हि स्पर्धा १५ वर्षांखालील मुलामुलींसाठी असून स्पर्धेला शहरातील गावदेवी मंदिरापासून सकाळी ७. ३० वाजता सुरुवात होणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १७ फेब्रुवारी पर्यंत नोंदणी करता येणार असून अधिक माहिती व नाव नोंदणीसाठी चिन्मय समेळ



८७६७१४९२०३ किंवा देवांशू प्रभाळे ८४३३५१३५४० यांची संपर्क साधावा आणि या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन स्पर्धा प्रमुख प्रशांत शेट्ये यांनी केले आहे.

# समाज संघटित करून जागृती केल्यास भारत विश्वगुरु होईल – किशोर पटले

**दैनिक युवक आधार**

**भंडारा जिल्हा प्रतिनिधी :** भारतीय हिंदू समाज संघटित करून जागृती केल्यास भारत विश्वगुरु बनल्याशिवाय राहणार नाही असे भावोद्गार आदर्श नगर येथील हनुमान मंदिर प्रांगणात आयोजित विशाल हिंदू संमेलन प्रसंगी बोलताना व्यक्त केले. भारत हा जवळपास सतराशे वर्ष गुलामगिरी त राहिला त्यामुळे आपला हिंदू समाज अनेक चालीरीती, संस्कृती, कौटुंबिक पणा हळूहळू कमी होऊ लागल्याने समाजाचे अधपतन होण्याची भीती निर्माण झाली. एकीकडे भारत स्वतंत्र करण्याचे आंदोलन चालत असताना दुसरीकडे मात्र अशा निद्रा अवस्थेत असलेल्या हिंदू समाजाला जागविण्यासाठी संघटित करण्याचे काम आपण केले पाहिजे असे डॉ. हेडगेवार यांना वाटले. त्यामुळे त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना 1925 साली केली. भारतातील हिंदू समाजाला संघटित करून त्यात जागरूकता निर्माण करून समाजव्यवस्था मधील होणारे बदल लक्षात घेऊन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने जवळपास समाजातील विविध क्षेत्रात विविध प्रकल्प राबविण्यासाठी 40 संघटन आज उभे केले आहे.

संघाच्या सुरुवातीला 50 वर्षात व्यक्ती निर्माण करून उरलेल्या पन्नास वर्षात विविध प्रकल्प राबवून त्यासाठी विविध संघटना ही निर्मिती करून पंचपरिवर्तनाचे विचार संघाने मांडले भौतिक वादाच्या काळात आम्ही आमच्या घराचे घरपण विसरून गेलो आहोत.




त्याची जाणीव आणि आम्हाला जाणवत आहे. कुटुंब व्यवस्था हा आमच्या समाजाचा कणा आहे याकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे. सामाजिक समरसता समाजात निर्माण करून समाजातील लहान विद्यार्थ्यांवर संस्कार घडवून आणणारा गुरुजन निर्माण करणे अत्यावश्यक झाले आहे. समाज प्रबोधन स्वभाव,स्वभोजन कुटुंबात मिळून मिसळून होणे, व स्वपोशाख, स्वसत्व, व्यक्ती निर्माण करून संस्कृतीला जपण्याची नितांत आवश्यकता आहे. असेही यावेळी बोलताना किशोर पटले म्हणाले.

हिंदू संमेलनाच्या प्रारंभी सकाळी 10.30 वाजता पालखी व दिंडी लक्ष्मीनारायण मंदिरातून काढून भजनी मंडळी द्वारे गावातील मुख्य रस्त्याने संमेलन स्थळी आणण्यात आले. यावेळी गोमाता पूजन, भारत माता पूजन, करण्यात आले. या विशाल हिंदू संमेलनाला यावेळी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे संचालक ॲड. होमेश्वर रोकडे , यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. गजानन डोंगरवार यांनी यावेळी मार्गदर्शन केले. सौ.अर्चला फटे यांनी नारीशक्ती चे महत्व पटवून दिले. जिजामातेने शिवाजीच्या रूपाने एक जाणता राजा संस्काराणे घडविता येतो. व समाजाचे रक्षण व संरक्षण करता येते. हे साऱ्या जगाला दाखवून दिले. समाजातील स्त्रियांनी सुद्धा संस्कृतीला जपले पाहिजे. नारीशक्ती चे सामर्थ्य राणी लक्ष्मीबाई ने इंग्रजा विरुद्ध लढून सर्वांना दाखविले आहे.

या कार्यक्रमाचे संयोजक प्रा. संजय निंबेकर यांनी संचलन केले. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी देविदास मेहर, विनोद वंजारी, वामन बोपचे, विना,संदीप केळकर, प्रतिभा घाटबांधे इत्यादींनी परिश्रम घेतले.

## कर्ज थकीत असलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग :** कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांची कागदपत्र संकलित करण्याचे काम नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व शाखांकडून सुरु आहे. त्यानुसार नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला संलग्नीत 587 सेवा/विविध कार्यकारी संस्थेमार्फत तसेच थेट बँकेकडून पीक कर्ज घेतलेल्या सर्व शेतकरी सभासदांनी वैयक्तिक माहितीची आवश्यक कागदपत्रे त्वरित बँकेच्या जवळच्या शाखेत किंवा तालुक्यातील सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात प्रत्यक्ष जमा करावे व जिल्हा प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी केले आहे. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाचे शासन निर्णयानुसार राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याचे उद्देशाने राज्य स्तरावर उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आली आहे. समितीने शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून त्यांची थकित कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी तसेच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याच्या दृष्टीने अभ्यास करुन अहवाल शासनास सादर करणार



आहे.

त्यास अनुसरुन, नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. नागपूर च्या माध्यमातून केलेल्या शेती कर्जाची मुदतीत परतफेड करु शकले नाहीत, असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांना बँकांकडून नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे उपरोक्त शासननिर्णयातील सुचनेनुसार थकित शेतकऱ्यांची कागदपत्र संकलित करण्याचे कामकाज नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सर्व शाखेकडून शाखा स्तरावर सुरु आहे.'शेतकऱ्यांनी त्याची वैयक्तीक माहिती अद्ययावत आधार कार्डची झेरॉक्स, मोबाईल क्रमांक ॲग्री स्टॅक फॉर्मर आय.डी.,कर्ज खाते पास बुक आणि सेव्हिंग खाते पास बुकची झेरॉक्स त्वरीत बँकेच्या जवळच्या शाखेत किंवा तालुक्यातील सहायक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयात प्रत्यक्ष जमा करावी व जिल्हा प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## ग्रामरोजगार सहायक संघटनेच्या रिसोड तालुकाध्यक्षपदी गजाननराव बाजड यांची अविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रिसोड/रणजितसिह ठाकूर :** महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत गावागावात शेतकरी शेतमजूर लाभार्थ्यांसाठी केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी उपक्रम असलेल्या मनरेगाच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविल्या जातात या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचे गावागावात ग्रामरोजगार सहायक नियुक्त करण्यात केलेले आहेत, शासन आणि शेतकरी यांच्या मधला ग्राम रोजगार सहायक हा दुवा मानला जातो, लाखो रुपयांची शेतकऱ्यांचे विकासात्मक कामे या ग्रामरोजगार सहायकांमार्फत केली जातात, रिसोड तालुका ग्रामरोजगार सहायक संघटनेची काल रिसोड पंचायत समिती सभागृहामध्ये महत्त्वपूर्ण बैठक अतिशय उत्साहात महत्त्वाची बैठक पार पडली या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष रमेशराव वाघ हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून



वाशिम जिल्हा अध्यक्ष विजयरावजी चौरे कारंजा, विष्णूजी पांढरे वाशिम, नरेंद्र अंभोरे जिल्हा उपाध्यक्ष, विदर्भ संघटक दिलीप भगत ,जिल्हा कोषाध्यक्ष दत्ता शेंदरकर,यांची उपस्थिती होती ,यावेळी उपस्थित मान्यवरांचा सर्वप्रथम पुष्प गुच्छ गुलाब देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नरेंद्र अंभोरे यांनी केले, तर वाशिम जिल्हा अध्यक्ष विजयरावजी चौरे, विष्णूजी पांढरे, विदर्भ संघटक दिलीप भगत कोषाध्यक्ष , माजी जिल्हाध्यक्ष रमेशराव वाघ यांनी संघटनेच्या हिताचे पुढील निर्णय पुढील धरणात्मक निर्णय संघटनेची वाटचाल आतापर्यंत संघटनेमार्फत झालेली कामे व यापुढे संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या ध्येयधोरण आणि प्रत्यक्षात कोणती भूमिका संघटनेमार्फत शासन स्तरावर मांडायची यासंदर्भात सविस्तर चर्चा यावेळी पार पडली. सदर या चर्चा नंतर रिसोड तालुका ग्राम रोजगार सहायक संघटना कडून तालुका कार्यकारणी नव्याने करण्याचा ठराव घेण्यात आला, यावेळी रिसोड तालुका ग्रामरोजगार सहायक संघटनेच्या वतीने केशवनगर येथील ग्रामरोजगार साहाय्यक गजाननराव बाजड यांची रिसोड तालुका अध्यक्ष पदी अविरोध निवड करण्यात आली त्यांचे कार्य व संघटने प्रति असलेली तळमळ पाहून सर्वानुमते अविरोध निवड करण्यात आली, यावेळी निवड झाल्यानंतर यावेळी निवडीनंतर बाजड यांनी उपस्थित ग्राम रोजगार सहायक यांचे निवडीबद्दल आभार व्यक्त केले आणि ग्राम रोजगार सहायक यांच्यावर होणारे अन्याय अडीअडचणी यासाठी आपण एकजुटीने काम करून आणि कुठल्याही ग्राम रोजगार सहाय्यक वर यापुढे काम करत असताना त्यांना कुठलाही त्रास होणार नाही याकडे आपण लक्ष घालू असे यावेळी उत्तर देताना म्हटले आहे जिल्हा कार्यकारिणीच्या वतीने व तालुका कार्यकारिणीच्या वतीने तालुअध्यक्ष म्हणून निवड झाल्याबद्दल गजानन बाजड यांचा सामूहिक सत्कार करण्यात आला. यावेळी रिसोड रिसोड तालुका उपाध्यक्षपदी सदाशिव काष्टे, सचिव पदी केशव हागे, सहसचिव नंदकिशोर खराटे ,कोषाध्यक्ष जगदीश देवढे, प्रसिद्धी प्रमुख पदी आत्माराम जाधव यांची निवड करण्यात आली यावेळी उर्वरित तालुका कार्यकारणी व सर्कलप्रमुख यांच्या नियुक्त्या येत्या आठ दिवसात करण्यात येतील असे ठरले यावेळी रिसोड तालुक्यातील बहुतांश ग्राम रोजगार सहायक उपस्थित होते.

# मिहान प्रकल्पांतर्गत पुनर्वसनाचे काम पूर्णत्वास - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल/मडावी नागपूर :** मिहान प्रकल्पाअंतर्गत खापरी (रे.) तेल्हारा, दहेगाव व कलकुही गावातील प्रकल्पग्रस्तांना सुमारे 781 कोटी एवढा निधी वाटप केलेला आहे. जितक्या अधिक प्रमाणात प्रकल्पग्रस्तांना न्याय देता येईल तो देण्याची भूमिका आपण घेतली. अनेकांना चांगल्या ठिकाणी प्लाटचे वाटप केले. लाभाच्या स्वरुपात निधी दिला. महसूल विभागामार्फत युद्ध पातळीवर ही सर्व प्रक्रिया पार पाडून पुनर्वसनाचे काम पुर्नत्वास आले आहे. या उपरही एखाद्या व्यक्तीला जर आपल्यावर अन्याय झाल्याची भावना असेल अथवा त्यांच्याकडे रीतसर आवश्यक ती कागदपत्रे असतील अशा लोकांच्या तक्रारीचा निपटारा करण्यासाठी विशेष शिबीर घेऊन एक महिण्यात सर्व विषय मार्गी लावण्याचे निर्देश महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुनर्वसन विभागाला दिले.

मिहान येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली आज पुनर्वसन व इतर प्रलंबित विषयाबाबत आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस जिल्हाधिकारी तथा मिहानचे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. विपीन इटनकर, मिहानचे सल्लागार सेवानिवृत्त अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रकाश पाटील, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) मलिक विराणी, वरिष्ठ व्यवस्थापक गौरव उपश्याम व विविध पदाधिकारी, पुनर्वसन प्रकल्पांतर्गत बाधित लोकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मिहान प्रकल्पांच्या भूसंपादन व पुनर्वसनासाठी 3 हजार 994 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. यापैकी बहुतांश निधी मिळाला आहे व त्याचे पुनर्वसनाच्या कामासाठी वाटप झालेले आहे. उर्वरीत निधीपैकी 2025-26 या आर्थिक वर्षासाठी 400 कोटी रुपयांची मागणी करण्यात आली होती. यापैकी शासनाने 240 कोटी रुपयांचा निधी दिला आहे. 160 कोटी रुपयांची मागणी नोंदविण्यात आली असून पुढील आर्थिक वर्षासाठी 597 कोटी रुपयांची मागणीही नोंदविण्यात आली आहे. शासनाकडून हा निधी महत् प्रयासाने हा निधी मिळविला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळोवेळी याबाबत आढावा घेतलेला आहे. या निधीतून वाढीव मोबदला प्रकरणे, पुनर्वसन अनुदाने, भूसंपादन, पुनर्वसन भागात नागरी सुविधा आदी कामांवर भर दिला असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

पुनर्वसन भागात लोकांची श्रद्धास्थानाविषयी असलेली मागणी लक्षात घेऊन नियमाप्रमाणे मंदीर, विहार आदीबाबत निर्णय घेतला जाईल. यात अधिकाधिक तीन हजार चौ.फूट एवढी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांनी जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांना निर्देश दिले. पुनर्वसन भागात मिहानअंतर्गत नागरी सुविधा देण्याचा आपण प्रयत्न केला. ग्राम पंचायतीमार्फत या गावांतील पाणी पट्टीची रक्कम भरण्याबाबत जो बेजबाबदारपणा आहे त्याबद्दल ग्रामविस्तार अधिकारी व तेथील ग्रामसेवकाला त्यांनी खडे बोल सुनावले. यापूर्वी नागरीकांना पाणीपट्टी सुसह्य व्हावी यासाठी अभय योजना देऊनही प्रतिसाद न मिळाल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. ग्राम पंचायत यांनी नळपट्टी, घरपट्टी वसुलीतून आपले हक्काचे आर्थिक स्त्रोत बळकट करणे आवश्यक आहे. यातूनच विकासाला दिशा मिळते असे त्यांनी सांगितले.

## मा.शिवाजी सोपान सपकळ सपकळवाडी सोसायटीच्या चेअरमन पदी



**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** सपकळवाडी ग्रामस्थांच्या वतीने आज स्व.गणपतराव सपकळ विविध कार्यकारी सोसायटी सपकळवाडीच्या नव्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. या सोसायटीच्या चेअरमनपदी शिवाजी सोपानराव सपकळ यांची तर व्हॉइस चेअरमनपदी विश्वजीत शंकरराव सपकळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली.संस्थेला जिल्ह्यातील विविध पुरस्कार प्राप्त झालेले असून या यशस्वी सोसायटीच्या नूतन चेअरमन यांचा सभासदांनी ग्रामस्थांनी हा सत्कार आयोजित केला. कार्यक्रमाला संस्थापक भाऊसाहेब सपकळ,माजी चेअरमन अजित सपकळ,बी.के.सपकळ,राजेंद्र सपकळ,रवींद्र सपकळ सर,तुकाराम सपकळ शत्रुघन घाडगे,आप्पासाहेब सपकळ,विष्णू भुजबळ,हेमंत सपकळ,जगदीश सपकळ, बापूराव जाधव,तानाजी नथु सपकळ,दशरथ सपकळ,नवींद्र सपकळ,रामचंद्र बोबडे यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.या सोहळ्यात नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले व संस्थेच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# संत वासुदेव महाराज अकोट नगरीचे अध्यात्मिक वैभव - नगराध्यक्ष माया धुळे

### गुरुमाऊली जयंती महोत्सवास भक्तीमय प्रारंभ !

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी/अकोट :** वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू संतश्रेष्ठ श्री वासुदेव महाराजांचे जीवन पवित्र आहे. त्यांनी समाजाच्या कल्याणासाठी आपलं आयुष्य चंदना सारखं झिजविलं ३४ ज्ञानग्रंथ विरचित करून समाजाला सत्याचा सन्मार्ग दाखविला. गुरुवर्य हे अकोट संत नगरीचे आध्यात्मिक वैभव आहेत. गुरु श्रींचा जयंती महोत्सव म्हणजे श्रद्धा भक्ती ज्ञानाचा अपूर्व संगम आहे अशा आशयाचे भावपुर्ण प्रतिपादन आकोटच्या नगराध्यक्षा सौ. माया धुळे यांनी केले.

श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेअंतर्गत आयोजित श्रीक्षेत्र श्रद्धासागर येथे शुक्रवारी श्री संत वासुदेव महाराज यांच्या १०९व्या जयंती महोत्सवाच्या शुभारंभ झाला या प्रसंगी बोलताना नगराध्यक्ष सौ माया धुळे बोलत होत्या.

याप्रसंगी भागवत ध्वज पुजन, गुरु



पुजन व गुरु वंदना नगराध्यक्ष सौ माया धुळे यांनी केले.नगराध्यक्षा सौ माया धुळे यांचा संस्थाध्यक्ष वासुदेवराव महल्ले यांचे हस्ते शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देवून यथोचित सत्कार करण्यात आला.दरम्यान पहाटे सकाळी श्रींचा अभिषेक तथा तीर्थ स्थापना व ग्रंथ पुजन संस्थेचे सचिव रवींद्र वानखडे यांचे शुभ हस्ते सपत्नीक पार पडले. श्री ज्ञानेश्वरी पारायणाला पहिल्या दिवशी भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पारायण पिठाचे नेतृत्व ह. भ.प. अंबादास महाराज व अनंत महाराज आवारे यांनी केले.

श्री क्षेत्र श्रद्धासागर जयंती महोत्सवात सहभागी झालेल्या वासुदेव भक्तांनी फुलून गेले आहे. भव्य मंडप, संतपीठावरील गुरुवर्यांचा रजत मुर्ती, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष वै. पंजाबराव हिंगणकर महाद्वार, वारकरी पताका, गुरु मंदिर व परिसराचे आकर्षक सुशोभीकरणाने या पुण्यभूमीत नवचैतन्य निर्माण झाले आहे. गावोगावचे सेवेकरी भाविकांचे सेवेत योगदान देत आहेत.

याप्रसंगी श्री भागवताचार्य ह.भ.प.प्रल्हाद महाराज भांडे व श्रीहरी महाराज सोनेकर, संस्थाध्यक्ष ह भ प श्री वासुदेवराव महल्ले उपाध्यक्ष बाबाराव बिहाडे व महादेवराव ठाकरे व कोषाध्यक्ष पुरुषोत्तम लाजुरकर, सचिव रवींद्र वानखडे सहसचिव अवी गावंडे, सुनंदाताई आमले जयदीप सोनखासकर अशोकराव पातळी नंदकिशोर हिंगणकर ॲड. शिरीष ढवळे दिलीपराव हरणे अनिल कोरपे, जयकृष्ण वाकोडे, मधुकरराव पुंडकर बाळासाहेब आमले, सुरेंद्र चिकटे, आदी मान्यवर उपस्थित होते.

## निवडणूका संपल्या, मतदारांच्या आता विकासाची वेळ?

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे : पाथरी/** मागील काही महिन्यांपासून जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात निवडणूकांचा धुरळा उडालेला आहे प्रचारादरम्यान विविध पक्षांच्या नेत्यांनी एकमेकांवर कुरघोडी करत जनतेचे लक्ष वेधून घेतले मात्र निवडणूका पार पडल्यानंतर आता तरी जिल्ह्याच्या त्या सोबत पाथरी तालुक्याच्या मुलभूत प्रश्नांकडे लक्ष देण्याची अपेक्षा मतदारांनी व्यक्त केली आहे जिल्ह्यातील राजकीय चित्र पाहिले असता पालकमंत्री भाजपच्या असलेल्या आरोग्य मंत्री मेघना बोर्डीकर शिवसेना (यूबीटी) चे खासदार संजय जाधव यांचा परभणी जिल्ह्यासाठी चांगला दबदबा आहे त्यामुळे विकासासाठी समन्वय साधण्याची संधी उपलब्ध असताना प्रत्यक्षात ठोस कामे होत नसल्याची भावना नागरिकांत होतं आहे गेल्या काही वर्षांपासून पाथरी तालुक्यातील मुदगल येथे लाखो रुपये खर्चून उभारलेल्या आरोग्य उपकेंद्राची दयनीय अवस्था झाली असून येथे तळीरामासह जुगार खेळणे मोठ्या प्रमाणात या आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीत चालतो तसेच पाथरी तालुक्यांत रोजगाराभिमुख उद्योगधंद्यांचा अभाव



गंभीर स्वरूपांत जाणवत आहे औद्योगिक गुंतवणूक नसल्याने युवक रोजगारासाठी पुणे मुंबई यासारख्या महानगराकडे धाव घेत असल्याचे चित्र आहे याच बरोबर तंत्रशिक्षण आधारित मोठे शौक्षणिक संकुल नसल्याने उच्च शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचं स्थलांतर मोठ्या संख्येने परभणी जिल्ह्यातून वाढले आहे या मुळे स्थानिक अर्थव्यवस्था कमकुवत होत आहे आणि ग्रामीण भागातील रस्त्यांची अक्षरशः चाळणीच झाली आहे खराब रस्त्यांमुळे वाहतूक खर्च वाढला असून व्यापारी वर्ग ठप्प होत आहेत शेतकऱ्यांना ऊस वाहतूक साखर कारखान्यापर्यंत नेणे कठीण झाल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत जिल्हा परिषद निवडणुकीत मात्र सर्व पक्षांच्या नेत्यांनी विकासाच्या माध्यमातून रस्त्यांची दुरुस्ती करू अशी आश्वासने दिल्याचे प्रकर्षाने जाणवत होते तसेच जिल्ह्यातच नव्हे तर पाथरी तालुक्यांत देखील वाळू तस्करी मोठ्या प्रमाणावर भरदिवसा अवैध विक्रीचे प्रमाण वाढल्याची सर्वत्र नेते मंडळींना दिसत आहे या अशा प्रकारांमुळे कायदा व सुव्यवस्था धोक्यात येतं असून प्रशासनाचा धाक कमी झाल्याचे नागरिकांचे मत आहे अशा ग्रामीण भागात बेकायदेशीर व्यवहारांमुळे सामाजिक वातावरण ही बिघडत असल्याची चिंता व्यक्त होत आहे पाथरी तालुक्यातील अनेक गावांतील जलजीवन योजनेतील कथित अनियमितता दिसुन येत आहे केंद्र सरकारच्या जलजीवन योजनेअंतर्गत अनेक गावांत कामे झाली असली तरी प्रत्यक्षात पाणीपुरवठा अजून ही सुरूळीत नसल्याच्या तक्रारी आहेत काही ठिकाणी तर कागदावर योजना पूर्ण पण प्रत्यक्षात नळ कोरडेच अशी स्थिती असल्याचे नागरिक सांगतात आज मतदारांच्या विकासाच्या अपेक्षा वाढल्या तीनही स्तरांवर सत्ता जवळपास एकाच गटाकडे गेल्याने आता परस्परांतील मतभेदापेक्षा समन्वयातून विकासकामे वेगाने होतील अशी अपेक्षा व्यक्त होत आहे जिल्ह्यातील देवस्थानचा जिर्णोद्धार चांगल्या पद्धतीने सर्वेक्षण करून भाविकांना सोयीसुविधा उपलब्ध होतील अशा अनेक प्रश्नांकडे आता ठोसपणे लक्ष दिले जाईल का याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे

## राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कोटपा कायदा २००३ अन्वये पानटपरीधारकांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** वाशिम,दि.१३ फेब्रुवारी (जिमाका) राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा रुग्णालय, वाशिम यांच्या वतीने तंबाखू नियंत्रण कायदा (कोटपा) २००३ अन्वये पानटपरीधारकांवर कारवाई करण्यात आली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त




जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी तसेच वाशिम पोलीस स्टेशन (शहरी) चे पोलीस निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १३ फेब्रुवारी २०२६ रोजी ही कारवाई राबविण्यात आली. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर व वाशिम पोलीस स्टेशन (शहरी) यांच्या संयुक्त विद्यमाने कोटपा कायदा २००३ मधील कलम ६(अ) व ६(ब) चे उल्लंघन करणाऱ्या एकूण १८ पानटपरीधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ३ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, राणी लक्ष्मीबाई कन्या शाळा परिसर, पाटणी चौक व रिसोड नाका या ठिकाणी ही तपासणी व कारवाई करण्यात आली.

या कारवाईमध्ये जिल्हा रुग्णालय, वाशिम येथील राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे जिल्हा सल्लागार डॉ. आदित्य पांडारकर, मानसशास्त्रज्ञ राम सरकटे, सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण धाडवे, मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेचे जिल्हा समन्वयक मंगेश गायकवाड, पोलीस स्टेशन (शहरी) विभागाचे पोलीस कर्मचारी तसेच गृह रक्षक दलाचे समादेशक यांचा सहभाग होता.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पाटोदा येथील तांबे सर यांच्या ओशन क्रिकेट अकॅडमी चा संघ भारतात पहिला



**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** यवतमाळ येथे आयोजित नॅशनल मोंटेक्स् बॉल क्रिकेट स्पर्धेत वसंतराव नाईक विद्यालय व ओशन क्रिकेट अकॅडमी, पाटोदा येथील विद्यार्थ्यांनी प्रथम येत जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या स्पर्धेत बिहार, तेलंगणा, काश्मीर व महाराष्ट्र a संघाने सहभाग घेतला. या मध्ये पहिला सामना बिहार बरोबर तर दुसरा सामना तेलंगणा व फायनल महाराष्ट्र a संघा बरोबर झाला. या मध्ये महाराष्ट्र ब संघात असलेल्या पाटोदा येथील डॉ.सुशिल तांबे सर यांच्या मार्गदर्शनात महाराष्ट्र संघाने विजय मिळावला व देशात पहिला येण्याचा मान मिळविला. बक्षीस वितरण राज्याचे सचिव अध्यक्ष धुलीचंद मेश्राम सर, वनविभागाचे अधिकारी चातोरे, तथा दाते कॉलेज बी पी ई एड चे प्राचार्य क्षिरसागर सर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सर्व राज्याचे खेळाडू, प्रशिक्षक व पदाधिकारी उपस्थित होते. खेळाडूंचे युवा नेते जयदत्त भैय्या धस यांनी कौतुक केले. आष्टी/पाटोदा/शिरूर मतदार संघाचे युवा तरुण तडफदार नेतृत्व जयदत्त भैय्या धस यांनी देश पातळीवर प्रथम आलेल्या संघाचा सत्कार केला. या वेळी खेळाडू आयुष येवले, हर्षद आवारे, साई बांगर, भाऊसाहेब बांगर, प्रशिक्षक डॉ.सुशील तांबे सर हे उपस्थित होते.

माजी समाज कल्याण सभापती महेंद्र गर्जे यांनी मुलांना यवतमाळ येथे जाण्यासाठी मोलाची मदत केली.

# तरुणांमधील हृदयविकार चिंतेचा विषय; 'लाईफस्टाईल' बदला, जीव वाचवा!

## हृदयविकार तज्ज्ञ डॉ. विक्रांत देशमुख यांचे सिल्लोडकरांना आवाहन; स्थानिक स्तरावर तज्ज्ञ सेवा सज्ज

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** "सध्याच्या धावपळीच्या युगात हृदयविकार हा केवळ वृद्धांचा आजार राहिला नसून, तरुणांमध्येही हार्ट अटॅक आणि ब्लॉकेजचे प्रमाण वेगाने वाढत आहे. चुकीचा आहार, मानसिक तणाव आणि व्यायामाचा अभाव यामुळे ही स्थिती ओढवली आहे. मात्र, वेळीच लक्षणे ओळखून तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली उपचार घेतल्यास हृदयविकारावर यशस्वी मात करणे शक्य आहे," असे प्रतिपादन प्रसिद्ध हृदयविकार तज्ज्ञ डॉ. विक्रांत देशमुख (मेडिकव्हर हॉस्पिटल) यांनी येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले.

स्थानिक बालाजी हॉस्पिटल आणि सिद्धेश्वर हॉस्पिटलच्या वतीने आयोजित या परिषदेत डॉ. देशमुख यांनी हृदय आरोग्याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, "अनेक रुग्ण छातीत होणाऱ्या वेदनांकडे ॲसिडिटी समजून दुर्लक्ष करतात. हृदयविकारात 'गोल्डन अवर' (पहिली ६० मिनिटे) अत्यंत महत्त्वाचा असतो. सिल्लोडमध्ये आता तज्ज्ञ सेवा उपलब्ध झाल्याने रुग्णांना तातडीने उपचार मिळून जीव वाचवणे सोप होणार आहे."

**ही लक्षणे दिसताच सावध व्हा:**

छातीत सतत दडपण किंवा तीव्र कळ येणे.

श्वास घेण्यास अडथळा निर्माण होणे.

डाव्या हातात, मान किंवा जबड्यात वेदना होणे.

अचानक येणारा अतिघाम, मळमळ किंवा चक्कर येणे.

आता सिल्लोडमध्येच मिळणार तज्ज्ञांचा सल्ला

ग्रामीण भागातील रुग्णांची होणारी पायपीट थांबवण्यासाठी मेडिकव्हर हॉस्पिटलच्या माध्यमातून आता तज्ज्ञ डॉक्टर सिल्लोडमध्ये सेवा देत आहेत. बालाजी हॉस्पिटलचे डॉ. बिरेंद्र झलवार आणि सिद्धेश्वर हॉस्पिटलचे डॉ. अभिलाष गोलेचा यांनी यावेळी रुग्णसेवेबाबत माहिती दिली. शहरात आता नियमित आरोग्य तपासणी शिबिरे आणि जनजागृती उपक्रम राबविले जाणार असून नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

> **वेळेत उपचार, जीवदान पक्के!**
>
> **"ग्रामीण भागातील रुग्णांना मोठ्या शहरात जाईपर्यंत मौल्यवान वेळ वाया जातो. सिल्लोडमधील नव्या सुविधेमुळे स्थानिक स्तरावरच तज्ज्ञांचे निदान आणि प्राथमिक उपचार मिळतील, ज्यामुळे मृत्यूचा धोका मोठ्या प्रमाणात कमी होईल."**
>
> **— डॉ. विक्रांत देशमुख**

**हृदय निरोगी राखण्यासाठी 'पंचसूत्री':**

१. संतुलित व कमी तेलकट आहार घ्यावा.

२. दररोज नियमित किमान ३० मिनिटे वेगाने चालावे.

३. व्यसनांपासून (धूम्रपान, मद्यपान) पूर्णपणे दूर राहावे.

४. तणावमुक्तीसाठी नियमित योग व ध्यानाचा सराव करावा.

५. नियमित आरोग्य तपासणी करून बीपी व शुगर नियंत्रित ठेवावी.

या पत्रकार परिषदेस डॉ. विक्रांत देशमुख, डॉ. बिरेंद्र झलवार, डॉ. लीना झलवार, डॉ. अभिलाष गोलेचा, डॉ. विनोद लोखंडे आणि जयदीप रनसिंग उपस्थित होते.

मेडिकव्हर हॉस्पिटलच्या नवीन उपक्रमांची माहिती सेंटर हेड डॉ. विशाल कुटे यांनी दिली.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा 'सब-ज्युनिअर' फुटबॉल संघ स्पर्धेसाठी नांदेडला रवाना

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/छत्रपती संभाजीनगर:** वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या (WIFA) वतीने नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद येथे आयोजित 'सब-ज्युनिअर जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धे'साठी छत्रपती संभाजीनगरचा जिल्हा संघ आज उत्साहात रवाना झाला. जिल्ह्याचे नाव क्रीडा नकाशावर उंचावण्याच्या निर्धाराने हा तरुण संघ मैदानात उतरणार आहे.स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंना डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या फुटबॉल मैदानावर सलग दहा दिवस सखोल प्रशिक्षण देण्यात आले. या सराव शिबिरात खेळाडूंच्या तांत्रिक कौशल्यांवर आणि शारीरिक क्षमतेवर विशेष भर



देण्यात आला. संघ रवाना होण्यापूर्वी जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष उमर अशफाक खान यांनी सर्व खेळाडूंची भेट घेऊन त्यांना मार्गदर्शन केले व आपल्या शहराचे नाव उज्वल करण्याचा विश्वास व्यक्त केला, अशी माहिती असोसिएशनचे सचिव रणजित भारद्वाज यांनी दिली.या संघाला मुख्य प्रशिक्षक आकिब सिद्दिकी यांच्यासह खिजर खान, मुजाहिद खान , अरबाज आणि जावेद शेख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. संघासोबत प्रशिक्षक म्हणून मुजाहिद युनुस खान आणि व्यवस्थापक म्हणून अरबाज अन्वर खान हे देखील रवाना झाले आहेत.

जिल्हा संघात यांचा समावेश:

संचित कोरानी, अली खान, फरहान अजहर शेख, रणवीर चव्हाण, ऋतुपर्ण दुधडे, देव कोल्हे, आतिफ हबीब, नभय पाटोदकर, शिवांश जिगीयासी, शौरभीम जाधव, हाफिज शेख, अर्णव पालोदकर, ऋत्विक धरणे, सुमित दहीवल, दनुष खानपुरे, समन्यु मगर, जैद जफर शेख, अली इम्रान खान व इब्राहिम अहमद खान.संघाच्या निवडीबद्दल आणि पुढील वाटचालीसाठी असोसिएशनचे अध्यक्ष उमर खान, उपाध्यक्ष खलील खान, बदर बिन सुलेमान, सचिव रणजीतसिंह भारद्वाज, सहसचिव अशरफ खान आणि कोषाध्यक्ष डिसूझा यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून स्पर्धेतील विजयासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दलची मालेगाव तालुका बैठक

**दैनिक युवक अधार**

**तालुका प्रतिनिधी प्रकाश भुरे :** भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल, तालुका मालेगाव यांच्या कार्यकारिणीतील काही रिक्त पदांचे पुनर्गठन करण्यासाठी गुरुवार, दि. १९ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजता तक्षशिला बुद्ध विहार येथे महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे.

तालुका प्रभारी माननीय शालिग्रामजी पठाडे (जिल्हा उपाध्यक्ष, संस्कार विभाग) यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. मालेगाव तालुक्यात विविध सामाजिक व प्रबोधनात्मक शिबिरे प्रभावीपणे राबविण्यासाठी संघटन बांधणी मजबूत करण्यावर या बैठकीत भर दिला जाणार आहे. यावेळी मा. देवानंद वाकोडे (जिल्हा सरचिटणीस) तसेच मा. अश्विनजी खिल्लारे (जिल्हा उपाध्यक्ष, संरक्षण विभाग) यांचे प्रमुख सहकार्य लाभणार आहे.

दि. २४ ऑगस्ट २०२४ रोजी तालुका शाखेची निवड करण्यात आली होती; मात्र अपेक्षित प्रगती न झाल्याने सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेऊन पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. आगामी काळात विविध शिबिरे यशस्वी करण्यासाठी तालुका व शहर संघटना बळकट करणे आवश्यक असल्याने, तालुका व शहर शाखेतील रिक्त पदांवर नव्याने निवडी करण्यात येणार आहेत.

तरी इच्छुक पदाधिकारी व समता सैनिक दल तसेच भारतीय बौद्ध महासभेचे सर्व पदाधिकारी यांनी या बैठकीला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन शहर अध्यक्ष कैलास इंगळे व मालेगाव तालुका कार्यकारिणी यांनी केले आहे.

# सणसरमध्ये उमेद अभियानांतर्गत अस्मिता महिला प्रभाग संघाचे प्रशिक्षण

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर येथे महाराष्ट्र शासनाच्या उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्थापन झालेल्या अस्मिता महिला प्रभाग संघाचे आदर्श प्रभाग संघ प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात दूरदृष्टी, वार्षिक कृती आराखडा व व्यवसाय विकास आराखडा यावर विशेष भर देण्यात आला.

संपूर्ण राज्यातील आदर्श प्रभाग संघातील महिलांच्या सशक्तीकरणासाठी हे प्रशिक्षण राबविण्यात येत असून,तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष इंदापूर अंतर्गत जिल्हा परिषद पुणे च्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत सणसर ग्रामपंचायत सभागृहात आयोजन करण्यात आले.या प्रशिक्षणासाठी मास्टर



ट्रेनर सुधीर पिसे सर यांनी प्रभाग संघाच्या कार्यकारी समितीच्या संचालक व ग्रामसखी यांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांमध्ये तालुका अभियान व्यवस्थापक सचिन बाबर,तालुका व्यवस्थापक राणी ननवरे, प्रभाग समन्वयक डी.जे.राऊत,प्रभाग संघाच्या अध्यक्ष कोमल मोरे,सचिव कांचन निंबाळकर,कोषाध्यक्ष वर्षा मोरे,प्रभाग संघ व्यवस्थापक कविता केकाण,लेखापाल काजल खुडे,कामिनी चव्हाण रेश्मा चव्हाण रोहिणी मोरे, मोहसीना सय्यद दीपाली गायकवाड तसेच ग्रामसखी व पदाधिकारी उपस्थित होते.या उपक्रमामुळे महिलांच्या नेतृत्वगुणांचा विकास होऊन ग्रामीण भागातील महिला सशक्तीकरणाला नवी दिशा मिळणार आहे.

# पुलवामा या अतिरेकी हल्ल्यात शहीद जवानांना कुर्ल्यात 'नवभारतीय शिव वाहतूक संघटने'तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली

**दैनिक युवक आधार**

**उमकांत पानसरे :** पुलवामा येथील भीषण दहशतवादी हल्ल्यात देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या अमर जवानांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी कुर्ला / मुंबई येथील नवभारतीय शिव वाहतूक संघटनेच्या मध्यवर्ती कार्यालयात (वाहतूक गड) येथे भावपूर्ण श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रम नवभारतीय शिव वाहतूक संघटनेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री हाजी अरफात शेख यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला.

मेणबत्ती प्रज्वलित करून आदरांजली

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शहीद जवानांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मेणबत्ती प्रज्वलित



करून जवानांच्या बलिदानाचे स्मरण करण्यात आले. यावेळी दोन मिनिटांचे मौन पाळून वीर जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाला स्थानिक पोलीस स्टेशन व वाहतूक विभागाचे पोलीस हवालदार दादासाहेब तांदळे यांनी विशेष उपस्थिती लावली. तसेच संघटनेचे कार्याध्यक्ष प्रवीण आखाडे , सरचिटणीस विनय मोरे , महिला सदस्य प्रिया तळगावकर, नयना कोळी आणि प्रवीण गायकवाड यांच्यासह संघटनेचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'देशहितासाठी कायद्याचे पालन करणे हीच खरी श्रद्धांजली'

याप्रसंगी बोलताना कार्याध्यक्ष प्रवीण आखाडे व सरचिटणीस विनय मोरे यांनी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले की, सीमेवर जवान रात्रंदिवस आपले रक्षण करत आहेत, म्हणूनच आपण सुरक्षित आहोत. प्रत्येक नागरिकाने देशहितासाठी जबाबदार बनणे आणि कायद्याचे काटेकोर पालन करणे हीच या शहीद जवानांना दिलेली खरी श्रद्धांजली ठरेल.वाहतूक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी आणि नागरिकांनी देशप्रेमाची भावना मनात ठेवून सामाजिक जबाबदारी पार पाडावी, असे आवाहनही यावेळी संघटनेच्या वतीने करण्यात आले.

# कन्नमवार नगरच्या सांडपाणी समस्येवर आमदार सुनील राऊत आक्रमक; मनपाकडे तातडीच्या कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/ प्रतिनिधी :** विक्रोळी (पूर्व) येथील कन्नमवार नगर परिसरात वाढत्या लोकसंख्येमुळे गंभीर झालेल्या सांडपाणी व ड्रेनेज समस्येबाबत आमदार सुनील राऊत यांनी महापालिका प्रशासनाकडे तातडीने उपाययोजना करण्याची ठाम मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी कार्यकारी अभियंता (विद्युत विभाग),गृहनिर्माण, बांद्रा तसेच सहायक आयुक्त, 'एस' विभाग यांना स्वतंत्र पत्रे पाठवून त्वरित कारवाई करण्याचा आग्रह धरला आहे.

कन्नमवार नगर परिसरात पूर्वी ३ ते ४ मजली इमारती होत्या. त्या काळात




४० एचपी क्षमतेचा सिव्हरेज मोटार पंप बसविण्यात आला होता. मात्र, सध्या या परिसरात २२ ते २३ मजली उंच इमारती उभारण्यात आल्याने लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. परिणामी, वाढत्या सांडपाण्याचा निचरा सध्याच्या ४० एचपी क्षमतेच्या पंपाद्वारे प्रभावीपणे होत नसल्याने अनेक ठिकाणी सांडपाणी साचण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे दुर्गंधी पसरून नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित ठिकाणी ६० एचपी क्षमतेचा नवीन सिव्हरेज मोटार पंप बसविण्याची मागणी आमदार राऊत यांनी केली आहे.

याशिवाय, कन्नमवार नगर क्रमांक २ येथील इमारत क्रमांक २३२ समोरील सार्वजनिक गटार वाहिनी विकासकाने बुजविल्यामुळे ड्रेनेज लाईन बंद झाली असून, सांडपाणी थेट रस्त्यावर साचत आहे. या प्रकरणी संबंधित विकासकाविरुद्ध तक्रारी प्राप्त झाल्याचे नमूद करत, बंद असलेली ड्रेनेज लाईन तात्काळ पूर्ववत करण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशी मागणीही आमदार राऊत यांनी केली आहे.

दोन्ही प्रकरणांमध्ये तातडीने प्रभावी कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा आणि करण्यात आलेल्या कारवाईची सविस्तर माहिती लेखी स्वरूपात कळवावी, अशी विनंती आमदार सुनील राऊत यांनी गृहनिर्माण बांद्रा तसेच महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

# सौरपंपाची केबल चोरणारी टोळी सक्रिय; शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी/ मारुती सत्रे :** आष्टी तालुक्यातील वाहिरा येथील शेतकरी बापू लक्षुमन पगारे, व बाळू हागरे, अंच्या शेतातील सौर ऊर्जापंप असलेल्या पंपाची केबल चोरीला गेली आहे, तसेच बापू लक्षुमन पगारे, यांची १००,फूट केबल तर बाळू हागरे, यांच्या पंपाची २२५ फूट केबल चोरीला गेल्याची घटना दि. १३ रोजी घडली आहे.

केबल) चोरी झाल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान



होऊ लागले आहे. केबल चोरी गेल्या मुळे शेतकऱ्याला पिकाला पाणी देण्या साठी अडचणी येऊ लागल्या आहेत. अगोदरच शेतीमालाला भाव नाही, उत्पादन खर्च निघणेही अवघड झाले आहे. अतिवृष्टीमुळे तर शेतकरी पुरता कोलमडला आहे. सुरळीत वीजपुरवठा नसल्याने पिकांना पाणी देणे जिकिरीचे जाते. अशा परिस्थितीत सोलर पंपाची केबल चोरीच्या घटनेने शेतकरी हतबल झालेला आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाकडे लेखी तक्रार देखील दिली आहे. परत दुसऱ्या शेतकऱ्याची घटना घडन्या आधी प्रशासनाने दाखल घेऊ लवकरात लवकर या चोरट्याच्या मुसक्या आवळाव्यात अशी शेतकऱ्यांची मागणी आहे

# विंचूर जि.प. शाळा प्रकरणात प्रशासनाचा ठोस इशारा

## "शाळेच्या जमिनीवर डोळा ठेवणाऱ्यांना सोडणार नाही" तहसीलदार विशाल नाईकवाडे

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे/निफाड तालुका प्रतिनिधी :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गट नं. ६२७ प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून प्रशासनाने स्पष्ट शब्दांत कठोर भूमिका जाहीर केली आहे. शाळेच्या जमिनीबाबत कोणतीही बेकायदेशीर नोंद किंवा फेरफार खपवून घेतली जाणार नाही, असा थेट इशारा तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी दिला आहे.



दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी ग्रामपंचायत विंचूर यांनी सादर केलेल्या निवेदनात गट नं. ६२७ मधील शाळेची जमीन चुकीच्या नोंदींवर आधारित खरेदी करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला होता. विद्यार्थ्यांच्या हक्कांशी निगडित हा विषय असल्याने प्रशासनाने तातडीने चौकशीचे आदेश दिले.

उपअधीक्षक, भूमी अभिलेख यांच्याकडून मागविण्यात आलेल्या अहवालानुसार मूळ सर्व्हे क्रमांक ६८२ हा गटस्कीमनंतर गट नं. १८२६ झाला आणि पुढे विंचूर गाव विभाजनानंतर गट नं. ६२७ असा निश्चित करण्यात आला. एकूण क्षेत्र ०.५४ आर असून, प्राथमिक तपासात सुमारे ०.१०.५० आर क्षेत्राची खरेदी झाल्याचे निदर्शनास आले आहे.जुने सिटी सर्व्हे क्रमांक १२३२, १२३३ व १२३४ हे सन १९७३ पासून जिल्हा परिषद, नाशिक यांच्या नावे नोंदवहीत नमूद असल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र स्वतंत्र मालमत्ता पत्रिका पूर्ण न झाल्याने महसूल विभागाकडील ७/१२ उताऱ्यावर तातडीने बंदी घालता येत नसल्याचे समोर आले आहे. दरम्यान, चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित मिळकतीवर कोणतीही फेरफार नोंद अथवा हस्तांतरण होऊ नये, यासाठी तलाठी यांना स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. चौकशी नोंदीनुसार जिल्हा परिषद शाळेची नोंद कायम ठेवण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**"शिक्षण संस्थेच्या जमिनीबाबत कोणतीही तडजोड होणार नाही. जर कोणी चुकीच्या नोंदी करून शाळेची जमीन खरेदी करण्याचा प्रयत्न केला असेल, तर त्याची सखोल चौकशी होईल आणि दोषी आढळल्यास कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्यांना प्रशासन सोडणार नाही."**


**तहसीलदार विशाल नाईकवाडे**

या ठाम भूमिकेमुळे प्रकरणात नव्याने हालचाल निर्माण झाली असून संबंधितांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रशासनाच्या पुढील कारवाईकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बंजारा धर्मगुरूंचे तेज खडूच्या माध्यमातून फळ्यावर उमटले; कलाशिक्षकाचे कौतुक

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी/ उमेश साखरकर :** श्री. संत सेवालाल महाराज जयंती संपूर्ण देशातील बंजारा बांधव मोठ्या उत्साहात जयंती साजरी करतात त्याअनुषंगाने डॉ. अच्युत अत्तेवार हायस्कूल तुपटाकळी येथील कला शिक्षक सुजित रमेश ठाकरे यांनी खडु लेखणीतून श्री संत सेवालाल महाराज यांचे अप्रतिम फलक रेखाटन केले आहे.




संत सेवालाल महाराज यांच्या येणाऱ्या 15 फेब्रुवारी जयंतीनिमित्त शालेय कलाशिक्षकाने आपल्या कलागुणांचा वापर करून खडु लेखणीतून रेखाटले महाराजांचे अप्रतिम चित्र सोशल मीडियावर व्हायरल होत आहे या चित्रात महाराजांच्या चेहर्यावरील भाव त्यांच्या आध्यात्मिक आणि सामाजिक सुधारणेचे रुप अत्यंत बारकाव्याने मांडण्यात आले आहे हे चित्र लेखणीच्या साह्याने काढल्यामुळे अतिशय सुक्ष्म आणि वास्तववादी दिसत आहे ज्या मध्ये बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराजांची शांत आणि तेजस्वी मुद्रा प्रकट होत आहे दरवर्षी तुपटाकळी येथे संत सेवालाल महाराज जयंती साजरी केली जाते. ते बंजारा समाजाचे थोर समाजसुधारक,क्रांतीकारक आणि पर्यावरणरक्षक म्हणून ओळखले जातात अत्तेवार हायस्कूल तुपटाकळी येथील शिक्षक सुजित ठाकरे सर यांनी अनेक महापुरुषांचे अप्रतिम फलक रेखाटन केले आहे या अनोख्या चित्रकलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजातील युवकांमध्ये महाराजांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या प्रयत्न केला आहे हे चित्र केवळ कलाकृती नसुन ते सत्य अहिंसा आणि सामाजिक सुधारणेच्या संदेशाचे प्रतिक आहे अशा प्रकाराची कलाकृतीमधुन नव्या पीढी पर्यंत पोहोचवण्याचे कौतुकास्पद कार्य केले.

## पत्रकारितेतील विश्वासार्ह नेतृत्व आणि समाजसेवेची तळमळ असलेला अवलिया:सचिनभाऊ बन्सोड

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादक :** पत्रकारिता हे केवळ माहिती देण्याचे साधन नसून ते समाजाला आरसा दाखवण्याचे आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. या माध्यमाचा खऱ्या अर्थाने जनहितार्थ वापर करणारे व्यक्तिमत्व म्हणजे पत्रकार सचिनभाऊ बन्सोड. येत्या १५ फेब्रुवारी रोजी त्यांचा वाढदिवस. त्यानिमित्त त्यांच्या गौरवशाली वाटचालीचा घेतलेला हा धावता आढावा.

निर्भीड पत्रकारितेचा प्रवास-

सचिनभाऊंनी पत्रकारितेमध्ये पाऊल ठेवल्यापासून कधीही तत्वाशी तडजोड केली नाही. "लेखणी ही तलवारीपेक्षा धारदार असते," हे त्यांनी आपल्या लेखणीतून वेळोवेळी सिद्ध केले आहे. सामान्य माणसाचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचविणे असो किंवा सत्तेच्या वर्तुळातील त्रुटींवर बोट ठेवणे असो, सचिनभाऊंचे नाव नेहमीच अग्रक्रमाने घेतले जाते. त्यांच्या बातम्यांमध्ये केवळ माहिती नसते, तर त्यामध्ये सर्वसामान्यांच्या वेदना आणि त्या सोडवण्याची तळमळ असते.

समाजसेवेचा ध्यास-

केवळ बातम्या लिहिण्यापुरते मर्यादित न राहता, त्यांनी समाजाप्रती असलेल्या आपल्या जबाबदारीचे भान नेहमीच राखले आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून मिळालेल्या ओळखीचा वापर त्यांनी गरजूंच्या मदतीसाठी केला. आरोग्य शिबिरे असोत, शैक्षणिक मदत असो किंवा संकटकाळी धावून जाण्याची वृत्ती, सचिनभाऊंनी नेहमीच संवेदनशीलतेचा परिचय दिला आहे. त्यांच्यासाठी समाजसेवा हा दिखावा नसून तो एक 'वसा' आहे.

तरुणांचे मार्गदर्शक-

आजच्या धावपळीच्या आणि ग्लॅमरस पत्रकारितेच्या काळात, नवीन पिढीतील पत्रकारांसाठी सचिनभाऊ हे एक उत्तम मार्गदर्शक आहेत. पत्रकारितेत टिकून राहण्यासाठी लागणारा संयम, अभ्यासूवृत्ती आणि निष्पक्षता हे गुण त्यांच्याकडून शिकण्यासारखे आहेत. 'द इंडियन न्यूज' परिवाराशी असलेल्या त्यांच्या स्नेहामुळे आम्हा सर्वांना नेहमीच एक नवी ऊर्जा मिळते.



एक अजातशत्रू व्यक्तिमत्व-

सचिनभाऊंचे व्यक्तिमत्व हे सर्वांना सोबत घेऊन चालणारे आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात त्यांचा दांडगा जनसंपर्क आहे. स्पष्टवक्तेपणा आणि मितभाषी स्वभाव ही त्यांची खरी ओळख. त्यांच्या कार्याची दखल आजवर अनेक स्तरांवर घेतली गेली आहे, पण त्यांच्यासाठी लोकांच्या मनात असलेले प्रेम हाच सर्वात मोठा पुरस्कार आहे.

"शब्दांना असते धार,
विचारांना असते गती,
तुमच्या लेखणीनेच
घडते समाजाची नवी प्रगती."

अशा या उमद्या नेतृत्वास आणि तरूण पत्रकारास वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा! सचिनभाऊंना उदंड आयुष्य लाभो आणि त्यांच्या लेखणीतून अशीच समाजसेवा घडत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

## नक्षी येथे विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण नवी दिल्ली, सर्वोच्च न्यायालय व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय मुंबई यांच्या निर्देशानुसार भिवापूर तालुक्यातील नक्षी येथे 15 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 वाजता "विधी सेवा महाशिबीर आणि शासकिय योजनांचा महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.महाशिबीर व महामेळावामध्ये मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायमुर्ती तथा पालक न्यायमूर्ती अनिल किलोर, मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाचे न्यायमुर्ती प्रफुल्ल सुरेंद्रकुमार सुबाळकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष दिनेश पी. सुराणा, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार व जिल्हयातील सुमारे 125 न्यायिक अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## स्टँड अप इंडिया' योजनेअंतर्गत 'मार्जिन मनी'चे प्रस्ताव सुधारित अटी व शर्तीनुसार सादर करा – समाज कल्याण विभागाचे इच्छुक लाभार्थींना आवाहन

**दैनिक युवक आधार**

**राकेश यादव वाडी नागपूर :** केंद्र शासनाच्या 'स्टँड अप इंडिया' योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजाच्या घटकांसाठी 'मार्जिन मनी' उपलब्ध करण्याची योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी इच्छूक लाभार्थ्यांनी नव्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून 'मार्जिन मनी'चा प्रस्ताव सादर करावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

हा प्रस्ताव सादर करण्यासाठी काही अटी व शर्ती लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार अर्जदार हा उद्योग सुरु करण्यासाठी यापूर्वी शासनाच्या अन्य योजनांचा लाभार्थी नसावा. प्रस्तावासोबत संलग्न करण्यात आलेले सर्व अभिलेखे हे अर्जदाराच्या माहितीनुसार सत्य व बरोबर आहेत, याबाबतचे रु.५००/-च्या स्टॅपपेपरवरील शपथपत्र अर्जदारास सादर करावे लागेल. अर्जदाराने निवडलेला व्यवसाय व त्याबाबत त्याला प्राप्त झालेले कार्यादेश हे अटी व शर्तीनुसार लागू राहतील. सबसिडीची रक्कम मिळण्यासाठी लाभार्थ्याने करुन दिलेल्या इन्डेम्निटी बाँडप्रमाणे सदर रकमेचा वापर संबंधितावर बंधनकारक असेल. सदर मंजूर लाभार्थ्याच्या कर्ज खात्यामध्ये मार्जिन मनीची १०० टक्के रक्कम जमा होईल तसेच संबंधित लाभार्थ्याने ज्या प्रयोजनासाठी शासनाकडे रक्कम मागणीची विनंती केलेली आहे, त्याच प्रयोजनासाठी ती रक्कम उपयोगात आणावी लागेल आणि ही अट लाभार्थ्यास बंधनकारक असेल. भविष्यात संबंधित लाभार्थ्यास शासनाकडून मार्जिन मनी रक्कम मंजूरीबाबत त्याच्या आवेदन/मागणी पत्रातील मुद्यांबाबत तसेच याबाबत भविष्यात काही तक्रारी उद्भवल्यास संबंधित लाभार्थ्याच्या अथवा वारसाच्या नावे असलेल्या स्थावर मालमत्तेतून सदर रकमेची एकरकमी महसुली येणेप्रमाणे वसुली करण्याच्या अटीच्या अधिन राहून मार्जिन मनी मंजूर करण्यात येईल.

मार्जिन मनी उपलब्ध करुन देण्यात आले असल्याबाबत संबंधिताचे बँकेचे हमीपत्र, लाभार्थ्याने मार्जिन मनी त्याच्या खात्यावर जमा झाल्यावर संबंधित बँकेकडून तसे प्रमाणपत्र प्राप्त करून घेवून आयुक्तालयास सादर करणे बंधनकारक असेल. अर्जदाराने प्रस्तावासोबत सादर केलेल्या प्रकल्प अहवालातील प्रकल्पाची मूळ रक्कम, बँकेने मंजूर केलेली ७५ टक्के कर्ज रक्कम व शासनाकडून मंजूर करण्यात आलेली १५ टक्के मार्जिन मनी रक्कम, यात तफावत आढळल्यास मार्जिन मनी म्हणून मंजूर करण्यात आलेल्या रकमेमध्ये जादा अदायगीची फरकाची रक्कम शासनाच्या खात्यात जमा करणे अर्जदारास बंधनकारक राहील. सदर आदेशानुसार उपलब्ध करुन देण्यात येणारी अनुदानाची १५ टक्के रक्कम प्रकल्पाच्या मुदत कर्ज व खेळते भागभांडवल या बाबींकरीता खर्च करणे बंधनकारक असल्याने बँकेस इतर बाबीची भरपाई म्हणून सदर रक्कम लाभार्थ्यास वापरता येणार नाही. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी फेरपडताळणी करुन सादर केलेल्या विहित प्रमाणपत्रांच्या आधारे मार्जिन मनी रक्कम मंजूर करण्यात येईल, असेही प्रसिद्धीपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे.

या योजनेसाठी इच्छुक लाभार्थ्यांनी मार्जिन मनीचे प्रस्ताव सर्व अटी व शर्तींची पुर्तता करून सहायक आयुक्त, समाज कल्याण, बी-विंग, सामाजिक न्याय भवन, शासकीय आय.टी.आय. समोर, श्रद्धानंदपेठ, नागपूर येथे सादर करावे, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

## प्रियदर्शनी चारिटेबल ट्रस्ट द्वारा कोहळीत चौथी धम्म परिषद संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग :** प्रियदर्शी चॅरिटेबल ट्रस्ट कोहळी च्यावतीने चौथ्या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. भदंत आनंद समता परिसर बाजार चौक कोहळी कळमेश्वर येथील समता सैनिक दलाच्या उपस्थितीत धम्म रॅली काढण्यात आली. त्यानंतर धम्म परिषदेचे उद्घाटन प.पूज्य भदंत महातिस्यम यांच्या शुभहस्ते झाले. धम्म परिषदेत धम्म ध्वजारोहन, बुद्धवंदना, पवित्र पाठ, धम्मदेशना, नाट्य, परिसंवाद, भोजनदान, सत्कार, प्रबोधन आणि बुद्ध भीमगीते तसेच आंबेडकरवादी दृष्टिकोनातून बुद्ध धम्म त्यागमूर्ती माता रमाई यांचा जीवन संघर्ष व दीक्षाभूमीवरील डॉ. बाबासाहेब




आंबेडकर यांच्या धम्मदीक्षेला 69 वर्ष पुर्णपणे होत असून धर्मांतराची 69 वर्ष आणि समाज वास्तव्य या विषयावर चर्चासत्रा घेण्यात आले. काटोल चे भीमेश भारती यांनी बुद्ध भीमगीते सादर केले. धम्म परिषदेचे कार्यक्रम ६ ते ८ फरवरीच्या दरम्यान संपन्न झाले. धम्म परिषदेच्या कार्यक्रमाला तन-मन- धनाने सहकार्य केले व बौद्ध उपासक तथा उपासिका पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून आले. या धम्म परिषदेच्या कार्यक्रमाची शोभा वाढवली. धम्म परिषदेला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष तन्मनाने सहकार्य करून मोठ्या संख्येने उपासक - उपासिका या कार्यक्रमाला हजर होत्या. धम्म परिषदेत उपस्थितीत सुखदेवराव उके, संगमित्राताई ढोके, अमश्जी चावरे, प्रा.प्रवीण कांबळे, आणि ॲड स्मिताताई ताकसंडे यांची उपस्थिती होती. असे धम्मपरिषदेचे आयोजक रेश्मा शैलेश उके यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले.

## घाटंजी तालुक्यातील पारवा–कुर्ली रोडवर अपघात; झाडझुडपांमुळे वळण दिसेनासे



**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर :** तालुक्यातील पारवा–कुर्ली रोडवर १३ फेब्रुवारी रोजी टाटा मॅजिक आणि व्हॅगनार यांच्यात अपघात झाला. रस्त्याच्या वळणावर मोठ्या प्रमाणात वाढलेल्या झाडझुडपांमुळे समोरून येणारा रस्ता स्पष्ट दिसत नव्हता. त्यामुळे हा अपघात घडल्याची माहिती समोर आली आहे.

या घटनेनंतर महेश पेंदोर आणि प्रेम वेट्टी यांच्या पुढाकाराने संबंधित विभागाशी संपर्क साधण्यात आला. संबंधित कर्मचारी व विभागाने तात्काळ दाखल घेत वळणाजवळील झाडझुडपे हटवून रस्ता अधिक मोकळा व स्पष्ट दिसेल यासाठी काम केले.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने वेळीच कारवाई केल्याबद्दल समाधान व्यक्त केले असून भविष्यात अशा ठिकाणी नियमित देखभाल करण्याची मागणी केली आहे.

# बीड भारत स्काऊट्स आणि गाईड्सचा ३३ वा जिल्हा मेळावा भव्यदिव्य वातावरणात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**आष्टी (प्रतिनिधी) बाळासाहेब रकटाटे :** बीड भारत स्काऊट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालय, बीड यांच्या वतीने आयोजित ३३ वा स्काऊट-गाईड जिल्हा मेळाव्याचे आयोजन स्काऊट भवन बीड येथे दिनांक १२व १३/०२/२०२६ या दोन दिवसी उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. गुरूवार दिनांक १२ रोजी पहिल्या दिवशी भव्य-दिव्य उद्घाटन सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला, तर दुसऱ्या दिवशी विविध स्पर्धांचे निकाल जाहीर करून समारोप समारंभ उत्साहात पार पडला.

मेळाव्याचे उद्घाटन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा जिल्हा मुख्य आयुक्त डॉ. किरण कुवर मॅडम यांच्या शुभहस्ते झाले. उद्घाटन प्रसंगी जिल्हा चिटणीस श्री रंगनाथ राऊत, सहाय्यक जिल्हा आयुक्त तथा ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) तथा जिल्हा आयुक्त स्काऊट श्री नानाभाऊ हजारे, अधीक्षक माध्यमिक श्री अजय बहिर, सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री तुकाराम पवार, राष्ट्रीय माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती द्रोपदी तायडे, विनायक प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका तथा सहाय्यक जिल्हा आयुक्त श्रीमती कीर्ती पांगरकर, यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा सहाय्यक जिल्हा आयुक्त श्री गणेश वाघ तसेच जवाहर विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा सहाय्यक जिल्हा आयुक्त स्काऊट श्री अभिमन्यू इबिते, जिल्हा संघटक योगेश आवढाळ, जिल्हा प्रशिक्षण आयूक्त स्काउट बापू शिंदे, यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

मेळाव्याचे प्रास्ताविक जिल्हा संघटक श्री योगेश आवढाळ यांनी करून दोन दिवसीय कार्यक्रमांची सविस्तर रूपरेषा मांडली. या मेळाव्यात संचालन स्पर्धा (स्काऊट-गाईड विभाग), साहसी स्पर्धा, चित्रकला व निबंध स्पर्धा, शेकोटी (सांस्कृतिक कार्यक्रम), तंबू निरीक्षण, फूड प्लाझा (आनंद नगरी), शोभायात्रा, सर्वधर्मीय प्रार्थना आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सर्व उपक्रमांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

जिल्हाभरातील २५ शाळांनी या मेळाव्यात सहभाग नोंदवला. एकूण २९० स्काऊट, २५२ गाईड, २२ स्काऊटर, १५ गाईडर तसेच नियोजन समितीतील ३० सदस्य असा मिळून ६०९ जणांचा लक्षणीय सहभाग लाभला. विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व



सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले, तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.

मेळाव्याचा समारोप जिल्हा चिटणीस श्री रंगनाथ राऊत यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. मेळावा प्रमुख म्हणून श्री विठ्ठल शिरसाठ यांनी तर मेळावा संचालक म्हणून श्री मोहन शेळके यांनी जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. सूत्रसंचालन श्री दीपक बिल्पे यांनी केले, तर आभार प्रदर्शन गजानन चौकटे यांनी मानले.मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांमधील स्काऊट व गाईड सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले. श्री दादाराव काकडे, सिद्धेश्वर मस्के, नितीन कुलथे, नितीन माळी, बापू शिंदे, प्रमोद धुर्वे, गजानन चौकटे, शिवदास पुरी, मुकुंद मैंद, प्रकाश गोरे, हनुमान बडे तसेच गाईड सदस्यांमध्ये श्रीमती प्रभावती अवचर, अनिता जोगदंड, मनीषा जाधव, वंदना हिरे, सुनिता घुगे, अस्मिता वाघमारे, आयोध्या पांचाळ, पुष्पा झिंजुर्के, रंजना जोशी आदींचा सक्रिय सहभाग लाभला.मेळावा यशस्वीतेसाठी जिल्हा कार्यालयाचे जिल्हा संघटक श्री योगेश आवढाळ, काझी मॅडम, त्रिगुणा वाघमोडे, श्री ज्ञानेश्वर धंदारे, चाटे आदींनी विशेष परिश्रम घेतले. दोन दिवस चाललेल्या या भव्य-दिव्य सोहळ्यामुळे जिल्ह्यातील स्काऊट-गाईड चळवळीला नवे बळ मिळाल्याची भावना उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

# जिल्हास्तरीय खो-खो चॅम्पियनशिप 2026 चा दिग्रस येथे शानदार शुभारंभ!

## भारतीय ऑलिम्पिकपटूंचे स्मरण आणि क्रीडा ज्योत ठरले विशेष आकर्षण!!

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी/उमेश साखरकर :** डॉ. एपीजे अब्दुल कलाम स्पोर्टस अकादमी दिग्रस, मॉनिटर क्लब इंग्लिश मिडीयम स्कूल दिग्रस आणि शारीरिक शिक्षण शिक्षक संघटना दिग्रस यांच्या संयुक्त वतीने आयोजित जिल्हास्तरीय खो-खो चॅम्पियनशिप 2026 स्पर्धेचा शानदार उद्घाटन समारंभ आज दिग्रस येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या समारंभाचे उद्घाटन दिग्रस नगर पालिकेचे शिक्षण सभापती डॉ. संजय बंग यांच्या हस्ते झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी प्रमोद सूर्यवंशी हे होते. उद्घाटन समारंभास कबड्डी का कालातुफान म्हणून ख्याती प्राप्त आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू प्यारेलाल पवार, नगरसेवक आदिल नागपुरे, प्रा. सुधीर पाठक, सेवानिवृत्त क्रीडा प्रशिक्षक सुरेश शर्मा, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख किरण बारशे, संविधान दिनाचे प्रणेते सदानंद आठवले, अमरावती विभागीय शिक्षक संघ यवतमाळ जिल्हाकार्याध्यक्ष गजानन गोटे, मॉनिटर क्लब इंग्लिश मिडीयम स्कूलचे प्राचार्य नितीन निम्मलवार, तालुका शारीरिक शिक्षण शिक्षक संघटनेचे अध्यक्ष जयवंत सास्तीकर, राष्ट्रीय कबड्डीपटू खुर्शीद पठाण, असलम पतलेवाले, विजय कांबळे, विभागीय खो-खो खेळाडू सलीम नौरंगाबादे, दिनबाई शाळेचे क्रीडा शिक्षक फैजान शेख, बॉल बॅडमिंटन प्रशिक्षक प्रशांत बावणेर, अविनाश गलाट यांची उपस्थिती लाभली.

हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद आणि देशाला पहिले वैयक्तिक ऑलिम्पिक पदक मिळवून देणारे कुस्तीपटू खाशाबा जाधव यांच्या प्रतिमांचे पूजन करून



तसेच क्रीडा ज्योत प्रज्वलित करून स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला.

उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ कलाम फोरमचे सचिव आमीन चौहान यांनी केले. उद्घाटक डॉ. संजय बंग आपल्या उद्घाटनीय संबोधनात म्हणाले की खेळामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होतो. खेळ माणसाला एक चांगला नागरिक म्हणून घडवतो. खेळामुळे चांगल्या सवयी लागतात आणि विद्यार्थी व्यसनांपासून दूर राहतो. शरीर, मन, बुद्धी आणि भावना यांचा समतोल विकास खेळामुळेच शक्य होतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःला किमान एका खेळाशी जोडणे आजच्या काळाची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रमोद सूर्यवंशी यांनी खेळाडूंना शुभेच्छा देत म्हणाले की, खेळातून शिस्त, संयम, आत्मविश्वास व संघभावना निर्माण होते. याच गुणांच्या बळावर विद्यार्थी जीवनात यशस्वी वाटचाल करू शकतो.

उद्घाटनानंतर झालेल्या प्रदर्शनीय सामन्याचा पाहुण्यांनी आनंद घेतला. खेळाडूंच्या खेळातील चपळता, वेग, समन्वय आणि संघभावना पाहून उपस्थितांनी टाळयांच्या गजरात दाद दिली.स्पर्धा यशस्वी करण्याकरिता फारुक चव्हाण, सादिक गारवे, अजीम शेख, सोनू शेख, पवन ढोरे, आशिष अगलदरे, सचिन घाटगे, वसंत सर्जेराव तसेच मॉनिटर क्लब इंग्लिश मिडीयम स्कूलचे विद्यार्थी समर्थ शेळके व इतर विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उद्घाटन समारंभाचे संचलन गुरुकुल इंग्लिश मिडीयम स्कूलचे क्रीडा शिक्षक आसिफ काझी यांनी केले, तर आभार प्रदर्शन गजानन इंगळे यांनी केले. यावेळी क्रीडाक्षेत्रातील मान्यवर, शिक्षक, पालक व क्रीडाप्रेमी, क्रीडा रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**16 संघ आणि 240 खेळाडू अन् 30 हजारांची बक्षिसे!**

जिल्हास्तर खो खो चॅम्पियन स्पर्धेत दिग्रससह जिल्ह्यातील महागाव, दारव्हा, आर्णी पंचायत समितीसह 16 संघांनी सहभाग नोंदवला. सुमारे 250 विद्यार्थ्यांनी मॉनिटर क्लब शाळेचे मैदान खेळाडूंनी फुलून गेले होते. सहावी ते आठवीची मुले आणि मुली अशा दोन गटात ही स्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक गटातील विजेत्याला दहा हजार आणि उप विजेत्याला पाच हजारांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. ट्रॉफी, मेडल आणि सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

---

# उद्योजक हरिभाऊ लगड यांचा पिंपरखेड शाळेसाठी प्रेरणादायी उपक्रम

## शाळेसाठी प्रिंटर देऊन कॉम्प्युटर देण्याची केली घोषणा

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी/बाळासाहेब रकटाटे :** आष्टी तालुक्यातील हिवरा गावचे भूमिपुत्र व पुणे येथील उद्योजक हरिभाऊ लगड यांनी सामाजिक बांधिलकी जपत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळखेड येथे स्वखर्चातून प्रिंटर भेट देत विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोलाची भर घातली. याच कार्यक्रमात त्यांनी शाळेसाठी कॉम्प्युटर देण्याची घोषणाही करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा स्तुत्य संकल्प व्यक्त केला.विद्यार्थ्यांप्रती असलेली त्यांची आस्था आणि शिक्षणाबद्दलची सकारात्मक दृष्टी ही या उपक्रमातून स्पष्टपणे दिसून आली. आजच्या डिजिटल युगात प्रिंटर व कॉम्प्युटरसारखी साधने शाळेसाठी अत्यंत आवश्यक असून, या सुविधांमुळे



विद्यार्थ्यांना प्रकल्प, अभ्यासक्रम व विविध शैक्षणिक उपक्रम अधिक प्रभावीपणे करता येणार आहेत.

या दातृत्वपूर्ण कार्याबद्दल शाळेच्या वतीने हरिभाऊ लगड यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी शिक्षण समितीचे अध्यक्ष महादेव चव्हाण उपाध्यक्ष अंकुश आढागळे, शालेय शिक्षण समितीचे सदस्य सुरेश औटे, मुख्याध्यापक असलम शेख,सर अतुल चव्हाण सर, महादेव आमले सर, सतीश एकशिंगे सर आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी हरिभाऊ लगड यांच्या या समाजोपयोगी कार्याचे भरभरून कौतुक केले.कार्यक्रमात बोलताना उपस्थितांनी सांगितले की, "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी अशा दानशूर व्यक्तिमत्त्वांचा हातभार अत्यंत महत्त्वाचा आहे. हरिभाऊ लगड यांचा हा उपक्रम इतर उद्योजकांसाठीही निश्चितच प्रेरणादायी ठरेल."शाळा प्रशासनाच्या वतीने त्यांच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानण्यात आले. तसेच ग्रामस्थांनीही या दानशूर व्यक्तिमत्त्वाचे कौतुक करत कृतज्ञता व्यक्त केली. शिक्षणासाठी केलेले हे योगदान भविष्यात अनेक विद्यार्थ्यांचे आयुष्य घडविणारे ठरेल, असा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

---

# आसेगावपेन शेत शिवारात चोराचेंच राज्य, पोलीसांचा नाही राहिला धाक

## रिठद महसुली मंडळात चोरांचे साम्राज्य, तोट्या चोरांचा सुळसुळाट

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/रणजितसिह. ठाकूर :** वाशीम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील आसेगावपेन येथील शेतशिवारातील रब्बी पिकासाठी स्प्रिंकरच्या माध्यमातून अनेक शेतकरी आपल्या शेतातील पिकाला पाणी देण्याचा वापर करतात. त्याच स्प्रिंकलरच्या तोट्याची चोरी आसेगावपेन येथील अनेक शेतकऱ्यांच्या तोट्याची चोरी १२ फेब्रुवारी चे रात्रीला झाली. हि घटना १३ फेब्रुवारी रोजी सकाळी उघडकीस आली.काहि शेतकऱ्यांनी आपल्या पिकाला शेवटचे पाणी देऊन स्प्रिंकलरच्या तोट्या एका ठिकाणी जमा करुन ठेवल्या होत्या.पण त्या छोट्या पाईप मधून काढून चोराने पळविल्या.अशा आठ ते दहा शेतकऱ्यांच्या शेतातील स्प्रिंकलरच्या तोट्या चोरी गेल्याचे सांगितले.रिठद महसूल मंडळातील चोऱ्यांचे प्रमाण भक्कमपणे वाढले असून चोरांना अडवणारा कुणीच राहिला नाही व आणखी पोलीसांचा तर वाटच राहिला नसल्याचे वारंवार होत असलेल्या चोऱ्या वरुन समजते.यासाठी वाशिम, रिसोड व शिरपूर पोलीस स्टेशनचे माध्यमातून संयुक्तीक चौकशी करून तपास चालू करावा.तरच ह्या चोऱ्या थांबतील .नाहीतर



चोरांना चोऱ्या करण्यासाठी वाव मिळेल.ह्या चोरी तोट्या गेलेल्या शेतकऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे

१) विश्वनाथ सोनाजी रेखे
२)किसन त्रबंक रेखे
३) विठ्ठल त्र्यंबक रेखे (२२)
४) शिवाजी खानझोडे (१५)
५) अशोक खानझोडे (१५)
६) अहमद पठाण(६)
७) नरवीर पठाण (१०)
८) शाहिद पठाण(४)
९) तुकाराम रेखे (१०)
१०) सुनील खानझोडे (३५)
११)अमोल खानझोडे(२०)
१२) शामराव खानझोडे(१५)
१३)अर्जुन खानझोडे(७)

इत्यादी पैनगंगा नदीकाठावरील शेतकऱ्यांच्या स्प्रिंकलरच्या तोट्या चोऱ्यांच्या प्रमाणात वाढ झाल्याने त्रस्त झाले आहेत.

याबाबत लवकरात लवकर तपास करावा अशी शेतकऱ्यांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

---

# जसखार ग्रामपंचायत उपसरपंचपदी सचिन घरत यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**उरण शहर प्रतिनिधी /सायली साळुंके :** उरण तालुक्यातील जसखार ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी युवा सामाजिक संस्थेचे सचिन हरिश्चंद्र घरत यांची बिनविरोध निवड झाली आहे. ही निवडणूक 13 फेब्रुवारी 2026 रोजी दुपारी 2 वाजता झालेल्या ग्रामपंचायत बैठकीत पार पडली. या बैठकीत सचिन घरत यांची बिनविरोध निवड झाली.या नंतर सचिन घरत यांच्या निवडीबद्दल युवा सामाजिक संस्था आणि जसखार यांच्या माध्यमातून उपस्थित सदस्यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. सचिन घरत यांची बिनविरोध निवड झाल्याने युवा सामाजिक संस्थेच्या समर्थकांनी फाटक्याच्या आतिश बाजी करत जलोष केला.या वेळी



ग्रामपंचायत सदस्या हेमालता ठाकूर, सीमा ठाकूर, धनवंती ठाकूर, वैजयंती ठाकूर, दमयंती म्हात्रे, सदस्य श्री राकेश तांडेल, शिवसेना तालूका प्रमुख दिपक ठाकूर, गणेश घरत, सुरेश म्हात्रे, सूर्यकांत ठाकूर, मा. सरपंच नितीन पाटील, निशांत ठाकूर, गिरीश मोकल, मयूर तांडेल, रितेश म्हात्रे, गणेश ठाकूर, चंद्रकांत घरत, आतिष घरत, मनीष मढवी व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

---

# उरण मधील ज्येष्ठ पत्रकार धनंजय गोंधळी कालवश

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** उरण तालुक्यातील चिरनेर येथील ज्येष्ठ पत्रकार तथा "सा. उरण टाइम्सचे" संपादक व कवी धनंजय चिंतामण गोंधळी (85) यांचे शनिवारी (दि.14) वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींसह ग्रामस्थ व नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कोकण एज्युकेशन सोसायटीच्या सेकंडरी स्कूलचे ते अनेक वर्ष चेअरमन होते. ऐनउमेदीच्या काळात भात शेतीसह बागायती,विविध कडधान्यचीपिके,आंबा लागवडअशाप्रकारच्या विविध पिकांवर विविध प्रकारे प्रयोग करून भरघोस पिके काढल्याने त्यांची दखल महाराष्ट्र शासनाच्या कृषीविभ्गाने घेऊन त्यांना महाराष्ट्र शासनाचा शेतीनिष्ठ पुरस्काराने गौरवविण्यात आलें होते, रायगड जिल्ह्यांतून प्रसिद्ध होणाऱ्या नामवंत कृषीवल या वृत्तपत्रातून त्यांनी आपल्या पत्रकारितेची सुरुवात करून पत्रकारितेतील लेखन सकस व वास्तवदर्शी होते. विविध व्यक्तिमत्त्वांची व्यक्ती चित्रे त्यांच्या लेखणीतून उतरली असून, विविध वृत्तपत्रातून वेगवेगळ्या विषयावर त्यांनी समीक्षा लेख लिहिले आहेत.

हळुवारपणे कवितेचे सौंदर्य उलगडणाऱ्या गोंधळी यांनी अस्वादक समीक्षेचा वस्तुपाठ प्रस्थापित केला होता. त्यांनी ग्रामीण पत्रकार म्हणून कृषीवल मधून, आपल्या लेखनाला सुरुवात केली होती. सामाजिक हक्क चळवळीतील पत्रकार म्हणून सामाजिक चळवळीला त्यांनी विशेष योगदान दिले होते. त्यांनी उरण टाइम्स हे साप्ताहिक सुरू केले होते. नाटक व रंगभूमी यांच्याशी त्यांचा संबंध होता.



एकेकाळी त्यांनी चिरनेर परिसरात शेतकरी कामगार पक्षाची मुहूर्तमेढ रोवून, उरण तालुक्यात शेतकरी कामगार पक्षाचा दबदबा निर्माण केला होता. चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांची शिल्प चित्रे उभी करण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे.शेकापचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय प्रभाकर पाटील, सुलभा काकू, दत्ता पाटील, दि बा पाटील, दत्तूशेठ पाटील, मीनाक्षी पाटील यांच्यासह शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, विवेक पाटील, बाळाराम पाटील, पंडित पाटील, सुप्रिया पाटील यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन पुत्र, दोन कन्या, सुना, जावई, नातवंडे, पंतवंडे असा आप्त परिवार आहे. सामाजिक चळवळीत अग्रगणी असणाऱ्या धनंजय गोंधळी यांचे निधन स्तब्ध करणारं आहे. आज दुपारी त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तीधाम स्मशानभूमीत विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींसह ग्रामस्थ व नातेवाईकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

---

# जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादक :** नागपूर, दि. 13 क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पूणे यांच्यामार्फत राज्याचे युवा धोरण २०१२ शासन निर्णयान्वये जिल्हा युवा पुरस्कार जाहीर करण्यात येत असतात. जिल्हयातील युवकांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा व युवा विकासाचे कार्य करण्यासाठी युवकांना प्रोत्साहन मिळावे यासाठी जिल्हास्तरावर युवा पुरस्कार दरवर्षी १ मे रोजी महाराष्ट्र दिनी शासनामार्फत देण्यात येते. जिल्हयातील युवक युवती व संस्थांनी सन २०२५-२६ करिता 5 मार्चपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुरस्काराचे स्वरुप :

> जिल्हा युवा पुरस्कार जिल्हास्तरावर एक युवक, एक युवतीस, एक नोंदणीकृत संस्था यांना रु.दहा हजार /- (प्रती युवक व युवती) व संस्थेसाठी गौरव पत्र, सन्मानचिन्ह, रोख रक्कम देण्यात येईल. या पुरस्काराचे स्वरुप गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार व्यक्ती रु.पन्नास हजार अशा स्वरुपाचा असेल.

युवक व युक्तीसाठी पात्रता निकष

> अर्जदार युवक/युवतींचे वय पुरस्कार वर्षातील १ एप्रिल रोजी १३ वर्षे पूर्ण ३१ मार्च रोजी २५ वर्षेपर्यंत असावे.

> जिल्हा पुरस्कारासाठी जिल्ह्यात १० वर्षे वास्तव्य असणे आवश्यक आहे.

> पुरस्कार व्यक्ती अथवा संस्थेस विभागून दिला जाणार नाही.

> पुरस्कार मरणोत्तर जाहीर करण्यात येणार नाही.

> केलेल्या कार्याचे सबळ पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, चित्रफीती व फोटो ई.)

> अर्जदार युवक व युवतींचे पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्षे क्रियाशील कार्यरत राहणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील.

> अर्जदार व्यक्तीचे कार्य हे स्वयंस्फूर्तीने केलेले असावे.

> एका जिल्हयात पुरस्कार प्राप्त करणारी व्यक्ती राज्यातील अन्य जिल्हयात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.

> केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय व निमशासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी तसेच विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक/कर्मचारी पुरस्कारासाठी पात्र राहणार नाहीत.

> अर्जदाराने पोलीस विभागाने प्रमाणित केलेला चारित्र्य दाखला (संबंधित परिक्षेत्रातील पोलीस स्टेशन) देणे आवश्यक राहील

संस्थांसाठी पात्रता

> पुरस्कार संस्थेत विभागून दिला जाणार नाही.

> संस्थांनी केलेल्या कार्याचे सबळ पुरावे अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. (उदा. वृत्तपत्र कात्रणे, प्रशस्तीपत्रे, चित्रफीती व फोटो ई.)

> अर्जदार संस्थेने पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर किमान दोन वर्षे क्रीयाशिल कार्यरत राहाणार असल्याचे हमीपत्र देणे आवश्यक राहील.

> अर्जदार संस्था सार्वजनिक विश्वस्त अधिनीयम १८६० किंवा मुंबई पब्लीक ट्रस्ट ॲक्ट १९५० नुसार पंजीबध्द असावी.

> अर्जदार संस्था नोंदणी झाल्यानंतर किमान पाच वर्षे कार्यरत असणे आवश्यक आहे.

> अर्जदार संस्थांचे कार्य हे स्वयंस्फूर्तीने केलेले असावे.

> एका जिल्हयात पुरस्कार प्राप्त करणारी संस्था राज्यातील अन्य जिल्हयात जिल्हा युवा पुरस्कारासाठी अर्ज करण्यास पात्र राहणार नाही.

> अर्जदार/संस्थेच्या सदस्यांचा पोलीस विभागाने प्रमाणित केलेला चारित्र्य दाखला (संबंधित परिक्षेत्रातील पोलीस स्टेशन) देणे आवश्यक राहील.

जिल्हयातील युवक युवती सन २०२५-२६ करिता १३ ते ३५ वयोगटातील (दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी १३ वर्षावरील व दि.31 डिसेंबर २०२५ रोजी ३५ वर्षाआतील असावा) संस्थानी सर्वोच्च कामगिरी केलेल्या युवांनी व संस्थांनी ५ मार्चपर्यंत एक प्रतीत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर येथे सिलबंद लिफाफ्यात अर्ज सादर करावे. असे जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक यांनी केले आहे. तसेच अर्ज प्राप्त करून घेण्याकरिता या कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविले आहे.

# जीवन, विचार, सामाजिक परिवर्तन आणि मानवतेचे दीपस्तंभ

भारतीय संत परंपरेत समाज प्रबोधनाचे, नैतिक मूल्यांचे आणि मानवतेचे दीपस्तंभ म्हणून संत सेवालाल महाराजांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ते बंजारा (लमाण) समाजाचे महान संत, समाजसुधारक आणि आध्यात्मिक मार्गदर्शक होते. त्यांनी आपल्या संपूर्ण जीवनातून सत्य, परिश्रम, प्रामाणिकपणा, समता, करुणा आणि बंधुभाव यांचा संदेश दिला. म्हणूनच संत सेवालाल महाराजांची जयंती हा केवळ उत्सवाचा दिवस नसून, त्यांच्या विचारांचे स्मरण करून ते आचरणात आणण्याचा पवित्र दिवस आहे.



**संत सेवालाल महाराजांचे बालपण व व्यक्तिमत्त्व**

संत सेवालाल महाराजांचा जन्म साध्या बंजारा कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांच्यात विलक्षण बुद्धिमत्ता, निरीक्षणशक्ती आणि करुणा दिसून येत होती. समाजातील गरिबी, अज्ञान, अन्याय आणि दुःख पाहून त्यांच्या मनात समाजपरिवर्तनाची तीव्र इच्छा निर्माण झाली. त्यांनी सांसारिक लोभ, लालसा आणि स्वार्थापेक्षा समाजहिताला अधिक महत्त्व दिले. साधे राहणीमान, संयमी आचार-विचार आणि उच्च नैतिक मूल्ये हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते.

**सामाजिक परिस्थिती**

संत सेवालाल महाराजांच्या काळात बंजारा समाज अनेक सामाजिक कुप्रथांनी ग्रासलेला होता. व्यसनाधीनता, चोरी, हिंसा, अंधश्रद्धा आणि शिक्षणाचा अभाव यामुळे समाज मागासलेला होता. या परिस्थितीमुळे

समाजाच्या प्रगतीला अडथळे निर्माण होत होते. संत सेवालाल महाराजांनी या समस्यांची मूळ ओळखून त्यावर उपाय सुचवले आणि समाजाला योग्य दिशा दिली.

**समाजसुधारणेचे कार्य**

संत सेवालाल महाराज हे केवळ उपदेशक नव्हते, तर कृतीशील समाजसुधारक होते. त्यांनी चोरी, व्यसन आणि हिंसा यांसारख्या वाईट प्रवृत्तींना ठाम विरोध केला.

"परिश्रम हाच खरा धर्म आहे" हा त्यांचा मूलमंत्र होता. त्यांनी प्रत्येकाला कष्ट करून प्रामाणिक जीवन जगण्याचा संदेश दिला. अन्यायाने किंवा फसवणुकीने मिळवलेली संपत्ती त्यांनी नाकारली आणि श्रमातून मिळालेल्या अन्नालाच पवित्र मानले.

**धार्मिक व नैतिक विचार**

संत सेवालाल महाराजांचा धर्मविषयक दृष्टिकोन अत्यंत व्यापक होता. धर्म म्हणजे केवळ कर्मकांड नव्हे, तर सदाचार आहे, हे त्यांनी समाजाला पटवून दिले. सत्य बोलणे, दुसऱ्याच्या हक्कावर गदा न आणणे, गरजूंची मदत करणे, वृद्धांचा सन्मान करणे आणि स्त्री-पुरुष समानता पाळणे, हीच खरी धार्मिकता आहे, असे ते सांगत.

सर्व धर्मांचा सन्मान करावा, जात-पात, उच्च-नीच भेद न करता मानवतेला सर्वोच्च स्थान द्यावे, हा त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

# संकटावर मात करत बहुफसली प्रयोग; देवगाव फाटा येथील पगार बंधू ठरले आदर्श

## अतिवृष्टीने द्राक्ष बागांचे नुकसान वांगी, टोमॅटो, कोबी, भोपळ्यांतून लाखोंचे उत्पन्न अपेक्षित

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : यावर्षी अतिवृष्टीमुळे द्राक्ष बागांना मोठा फटका बसून अपेक्षित उत्पादन मिळाले नाही. वर्षभर जपावे लागणारे द्राक्ष पीक हातचे जाऊ लागल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. मात्र, देवगाव फाटा येथील प्रयोगशील शेतकरी साहेबराव नारायण पगार व भाऊसाहेब नारायण पगार यांनी द्राक्ष बागेतच पर्यायी पिकांची लागवड करून संकटावर मात केली आहे. त्यांच्या या बहुफसली प्रयोगाची परिसरात जोरदार चर्चा होत आहे.

दोन एकर एस.एस.एन द्राक्षे बागेत ऑक्टोबर छाटणीनंतर उत्पादन न आल्याने त्यांनी दि.१६ नोव्हेंबर रोजी एका एकरात गॅलन वांगी तर दुसऱ्या एकरात पंचगंगा वांग्याची लागवड केली. दोन महिन्यांनी गॅलन वांग्याचे उत्पादन सुरू झाले असून आगामी दोन महिने उत्पन्न मिळणार आहे. दिवसाआड सुमारे १०० क्रेट उत्पादन मिळत आहे. या वांग्याला प्रति क्रेट १८० ते २०० रुपये भाव मिळत आहे. एकरी सुमारे तीन हजार क्रेट उत्पादनाचा अंदाज आहे. यामधून सुमारे पाच





ते सहा लाख रुपये उत्पन्न अपेक्षित आहे. पंचगंगा वांग्याला दोन महिन्यांत फळधारणा सुरू झाली असून १५ किलोच्या क्रेटला ३५० ते ४०० रुपये भाव मिळत आहे. दिवसाआड ५० क्रेट उत्पादन मिळत असून एकूण पंधराशे कॅरेट उत्पादनातून चार लाख रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे.

द्राक्षे बागेच्या प्रति वेलीला एक असे ५ फूट अंतरावर एकरी ९०० वांगे रोपांची लागवड करण्यात आली. पाणी

**@ द्राक्षाला माल आला नाही म्हणून हताश न होता पर्यायी पिकांचा विचार केला. पाणी, खत व कॅनोपी व्यवस्थापन केले. कमी कालावधीत उत्पन्न मिळावे हा उद्देश होता. योग्य नियोजन केल्यास कोणतेही संकट संधी बनू शकते.**

**- साहेबराव नारायण पगार**
**शेतकरी**

**@ अतिवृष्टीमुळे द्राक्ष शेती संकटात असताना बागेतील मोकळ्या जागेत भाजीपाला आंतरपीक घेतल्यास शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळून आर्थिक जोखीम कमी होऊ शकते. पगार बंधूंचा हा नवीन प्रयोग इतर शेतकऱ्यांसाठी नक्कीच आदर्श ठरेल.**

**- सुधाकर पवार,**
**तालुका कृषी अधिकारी, निफाड**

व खत व्यवस्थापनासाठी द्राक्षे बागेच्या ठिबक सिंचनाचा वापर करण्यात आला. त्यामुळे द्राक्षे बाग व वांगे यांच्यासाठी एकत्रित पाणी व खत व्यवस्थापन झाल्याने उत्पादन खर्च कमी झाला. एकरी २५ हजार प्रमाणे दोन

एकरासाठी ५० हजार रुपये उत्पादन खर्च आला. बुलेट सिद्ध गोल्डन या दीड एकर द्राक्ष बागेत दि. ५ डिसेंबर रोजी विरांग या उन्हाळी जातीच्या वाणाची टोमॅटो लागवड केली आहे. योग्य नियोजन केल्याने टोमॅटो पिक बहरून आले आहे. साधारणतः तीन महिन्यांनी त्याचे उत्पादन सुरू होणार आहे. अशाप्रकारे द्राक्षे बागेत कमी कालावधीत उत्पन्न देणारी पिके घेऊन त्यांनी आर्थिक तोटा टाळला. याशिवाय तोडलेल्या द्राक्षे बागेच्या लोखंडी खांब व तारेचा आधार घेऊन दि.१२ नोव्हेंबर रोजी दिड एकरात वरद वाणाचे भोपळे लागवड केली आहे. सर्व पिकांसाठी ठिबक सिंचनाचा वापर केल्याने पाणी बचत व अचूक खत व्यवस्थापन साध्य झाले आहे. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता बहुफसली पद्धत अवलंबल्यास नुकसान टाळता येते, द्राक्ष बागेतील मोकळ्या जागेचा योग्य वापर करून कमी कालावधीत उत्पन्न देणारी भाजीपाला पिके घेतल्यास

# पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी कराडी समाज एकवटला !

## २७ जातींच्या आरक्षणावर लवकरच दिल्लीतून गुलाल उधळणार?

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील २७ ओबीसी पोट जातींचा केंद्र सरकारच्या इतर मागासवर्गीय ओबीसी यादीत समावेश करण्याच्या प्रलंबित प्रश्नाला आता मोठी गती मिळाली आहे .या ऐतिहासिक निर्णयासाठी कराडी समाजाने पुकारलेला लढा आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून, लवकरच केंद्र सरकारकडून यावर शिक्कामोर्तब होण्याची दाट चिन्हे दिसत आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून थेट केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री डॉ विरेंद्र कुमार यांच्याशी संवाद साधला आणि या प्रस्तावाला लवकरात लवकर मंजुरी देऊन.

महाराष्ट्रातील लाखो ओबीसी तरुणांना न्याय द्यावा, अशी विनंती मुख्यमंत्र्यांनी केंद्राकडे केली आहे.या संपूर्ण संघर्षात कराडी समाजाची मोहीम अत्यंत महत्त्वाची ठरली आहे. समाजाच्या पुढील पिढीचे शैक्षणिक आणि नोकरीतील भवितव्य सुरक्षित करण्यासाठी कराडी समाज या लढ्यात अग्रभागी राहिला. महाराष्ट्र कराडी समाजाचे अध्यक्ष महादेव बंडा यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने



आरक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर अत्यंत सकारात्मक आणि आक्रमक पाठपुरावा केला आहे.

महाराष्ट्र ओबीसी कृती समितीचे पदाधिकारी सध्या दोन दिवसीय दिल्ली दौऱ्यावर असून त्यांनी केंद्रीय मंत्रालयातील उच्च अधिकारी यांची भेट घेऊन या प्रश्नावर तातडीने स्पष्टता करण्याची मागणी केली आहे .राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाने या २७ जातींबाबत संयुक्त सुनावणी घेऊन आधीच सकारात्मक अहवाल सादर केला आहे .आता केवळ केंद्रीय कॅबिनेटच्या अंतिम मंजुरीची प्रतीक्षा असून लवकरच हा तिढा सुटण्याची शक्यता आहे.

*राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली हा लढा यशस्वी होताना दिसत आहे. या मोहिमेत ओबीसी मागासवर्गीय कृती समितीचे अध्यक्ष श्री फरकाडे साहेब, उपाध्यक्ष विलास पाटील, सहसचिव प्रल्हाद कासकर हे सध्या दील्ली दौऱ्यावर आहेत यांच्यासह कराडी समाजाचे अनेक दिग्गज पदाधिकारी सक्रिय आहेत. यामध्ये महादेव बंडा,( अध्यक्ष महाराष्ट्र कराडी समाज) विलास पाटील सचिव महाराष्ट्र कराडी समाज , रमण कासकर, सूरदास गोवारी, मधुकर सुरते, मधुकर भगत ,शिवदास पाटील, शांताराम भगत ,सुनील पाटील, रमेश ढबूसे, दत्ता शेळके ,गणेश पाटील, हरिश्चंद्र पाटील, के.जी.पाटील ,शिवचंद्र भोपी, शंकर भोईर, जितेंद्र भोईर, दिलीप पाटील , महेंद्र पाटील ,संतोष माझगांवकर , विनोद पाटील , चंद्रकांत पाटील , शंकर कासूकर , नामदेव पाटील , अनंत पाटील , नरेश भोईर या वरील ४५ कार्यकारी सदस्यांनी पुणे आयोग येथे दौऱ्यात सहभाग घेतला होता. तसेच या संपूर्ण कामकाजाची दस्तऐवज हाताळणी मा. आमदार महेश शेठ बालदी साहेब आणि मा रवी भोईर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली झाली आहे.आणि आता यांच्या या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे केंद्राकडून सकारात्मक निर्णयाची अपेक्षा वाढली आहे.

# नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवास रविवार पासून सुरवात,जिल्ह्यातील निसर्गप्रेमींमध्ये उत्साह

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ तालुका प्रतिनिधी** : जिल्ह्याचे भूषण असलेला मेळघाटातील ऐतिहासिक नरनाळा किल्ला, समृद्ध वनसंपदा आणि स्थानिक संस्कृती यांचे दर्शन घडवणारा नरनाळा महोत्सव दि. १५ ते १७ फेब्रुवारीदरम्यान उत्साहात साजरा होणार आहे. दीर्घ कालावधीनंतर महोत्सव होत असल्यामुळे जिल्ह्यातील निसर्ग पर्यटनप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण असून, यानिमित्त आयोजिण्यात आलेल्या विविध उपक्रमांत मोठ्या प्रमाणावर नागरिक सहभागी होत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालय व वनविभाग, अकोट वन्यजीव विभाग यांच्या सहकार्याने निसर्गप्रेमींसाठी नरनाळा निसर्ग पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनात विविध यंत्रणांच्या सहकार्याने नियोजन व पूर्वतयारी करण्यात आली आहे. महोत्सवाच्या माध्यमातून नरनाळा किल्ल्याचे ऐतिहासिक महत्व, स्थानिक संस्कृती, पर्यावरण संवर्धन आणि इको टुरिझमबाबत जनजागृती करण्याचा हेतू असून, साहसी खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच अनेकविध उपक्रम घेतले जाणार आहेत. या महोत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्यातील पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते दि. १५ फेब्रुवारी रोजी दु. ४.३० वा. महोत्सवाचा शुभारंभ होणार आहे. मान्यवर लोकप्रतिनिधी, अधिकारी, विविध क्षेत्रांतील मान्यवर, निसर्गप्रेमी व मोठ्या संख्येने नागरिक यावेळी उपस्थित राहणार आहेत.

**विविध स्पर्धांचे आयोजन :**

महोत्सवात निसर्ग पर्यटनावर आधारित विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवाचे तिन्ही दिवस सकाळी ६ ते सायंकाळी ६ दरम्यान ट्रेकिंग, जंगल सफारी, बोटिंग, नरनाळा किल्ला सफारी असे निसर्गपर्यटनाधारित कार्यक्रम होतील.

दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता महिला व पुरूषांसाठी 'मॅरेथॉन-संवर्धनासाठी धाव' होणार आहे. त्यासाठी अकोट फॉरेस्ट डेपो ते श्री संत गजानन महाराज विहीर फाटा असे साधारणत: १२ किमी अंतर असेल. चित्रकला स्पर्धा दि. १६ फेब्रुवारीला सकाळी १०ते २ दरम्यान विहीर फाटा परिसरात होईल व याच दिवशी दुपारी २ वाजता शहानूर येथे पाक कला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. वन्यजीव छायाचित्रण स्पर्धाही आयोजिण्यात आली आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी :-**

महोत्सवात तिन्ही दिवस सांस्कृतिक कार्यक्रम सायं. ५ ते रा. १० वा. दरम्यान होणार आहेत. दि. १५ फेब्रुवारीला 'चला हवा येऊ द्या' टीमचे प्रसिद्ध मराठी कलावंत कार्यक्रम सादर करणार आहेत. दि. १६ फेब्रुवारीला 'शिवशंभो गर्जना टीम'कडून सादरीकरण होणार आहे. इंडियन आयडॉल विनर सलमान अली 'लाईव्ह इन कॉन्सर्ट' सादर करणार आहेत. दि. १७ फेब्रुवारीला पद्मश्री कैलाश खेर यांची 'लाईव्ह इन कॉन्सर्ट' होणार आहे. निसर्ग संवर्धनाबाबत जनजागृती करणे व मानव आणि पर्यावरण यांच्यातील नाते दृढ करणे हा महोत्सवाचा प्रमुख हेतू आहे. ऐतिहासिक महात्म्य लाभलेला नरनाळा किल्ला व मेळघाटचे समृद्ध जंगल हे अकोला जिल्ह्याचे गौरवस्थान आहे. महोत्सवात अधिकाधिक निसर्गप्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना, उपवनसंरक्षक राहूलसिंह टोलिया व जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# अजितदादा आणि बीडचा विकास समीकरण...



दिवंगत उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार आणि बीड जिल्ह्याचे विकास समीकरण म्हणजे" लोखंडाला जसा परिस स्पर्श होताच लोखंडाचे सोने होते." विकास प्रक्रियेपासून वंचित राहिलेल्या बीड जिल्हाला बारामती सारखा विकसित बीडला करू पाहणारे दादा परिसा सारखे होते. हे म्हणणे काही अतिशोक्ती होणार नाही. बीड जिल्ह्याचा विकास हा प्रामुख्याने सिंचन, पायाभूत सुविधा आणि औद्योगिकीकरणावर आधारित आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री या नात्याने, अजित पवारांनी बीडच्या प्रलंबित प्रकल्पांना निधी आणि गती दिली आहे, ज्या मुळे जिल्ह्यातील आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळत होती दादांनी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून बीडच्या विकासाची ब्ल्यू प्रिंट तयार करून जबाबदारी स्विकारून विकास कामांना सुरुवात केली होती. अजित दादा आणि बीडचा विकास समीकरण...

:- पाणी आणि सिंचन: बीड जिल्हा दुष्काळी असल्याने, अजित पवार यांनी सिंचन प्रकल्पांना (उदा. बीड मधील विविध सिंचन कामे) प्राधान्य दिले आहे. स्थलांतरीत ऊसतोडणी कामगारांच्या कल्याणासाठी कायम रोजगार उपलब्ध होवुन भटकंती थांबण्यासाठी शास्वत उत्पन्न निर्माण करण्यासाठी जलसंधारणाच्या कामांवर भर देऊन शेतीला नियमित पाणीपुरवठा करण्याचे त्यांचे उद्दिष्ट होते.

:- पायाभूत सुविधा: रस्ते, पूल आणि ग्रामीण विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देऊन बीडची कनेक्टीव्हिटी सुधारण्याचे काम त्यांच्या नेतृत्वाखाली होत आहे.

:- औद्योगिक विकास: बीडमध्ये बेरोजगारांना रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी औद्योगिक वसाहती (MIDC) सक्षम करणे आणि खाजगी गुंतवणुकीला आकर्षित करणे यावर त्यांचा भर होता. बीडला विमानतळ उभारण्याचा धोरण आखले व त्या कामात गतीने सुरूवात केली. या मुळे बीडच्या विकासात भर घालणारी कारखानदारी वाढेल व बीडच्या युवक युवतींना रोजगार उपलब्ध होईल अशी भूमिका यामागे त्यांची होती.

:- राजकीय समीकरण: बीड जिल्ह्यातील स्थानिक नेत्यांना सोबत घेऊन विकासाचे निर्णय जलद गतीने राबवणे, व विकास कामात पक्षीय राजकारण दादा येवु देत नव्हते. हे अजित पवारांचे प्रमुख कौशल्य ठरत होते. थोडक्यात सांगायचे तर, अजित पवारांचा बीडमधील विकास दृष्टीकोन 'कामाचा वेग आणि आर्थिक शिस्त' व्यवस्थित नियोजन यावर आधारित आहे, ज्या मुळे बीड जिल्ह्यातील आर्थिक आणि सामाजिक विकासाला अधिक गती मिळत आहे.

बीड जिल्ह्यातील आर्थिक आणि सामाजिक विकासाला गती देण्यासाठी बीड जिल्ह्यात अल्पकाळात विकास दृष्टी, शिस्त, समयसूचकता, नियोजन, विकास आणि आशेचा मार्ग दाखवणाऱ्या अजित पवारांनी बीडच्या विकासासाठी विविध विभागांचा निधी व जिल्हा नियोजन समितीला वाढीव निधी दिला. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी मी स्वत: अर्थमंत्री म्हणून अधिकाधिक निधी देत आहे, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी वेळोवेळी जाहीर केली. नुकताच पार पडलेल्या बीड नगर पालिकेच्या निवडणुकीत राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीडची नगर परिषद सत्ता आमच्या हाती द्या, वर्षानुवर्षांपासूनचे बीड शहराचा राहिलेला संपूर्ण विकास करून दाखवतो असे आश्वासन दिले बीडच्या जनतेने त्यांना प्रतिसाद देत विश्वास दाखवत नगराध्यक्षा सह संपूर्ण सत्ता दादांच्या हाती दिली. बीड जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून सर्वांच्या सहकार्याने बीड जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करुन चेहरा-मोहरा बदलणार होते; १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी 'बीड - अहिल्यानगर' रेल्वे सुरु केली. लवकरच परळी-अहिल्यानगर गतिमान रेल्वे सुविधा सुरू करून बीडला अनेक शहरांशी जोडण्यासाठी ते विशेष प्रयत्न करत होते. जिल्हा परिषद बीड अंतर्गत १३६३ विकास कामांचा शुभारंभ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते नववर्षाच्या प्रथम शुभ दिनी बीड जिल्ह्याच्या विकासाला नवी दिशा देणारा ऐतिहासिक सोहळा छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे संपन्न झाला होता.

बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून शेकडो विकास कामांचं नियोजन अजित दादांनी केले होते. असे शासकीय यंत्रणेने त्या कामाचा कृती आराखडा पण प्रस्तावित केला होता लवकरच निधी उपलब्ध करून पालकमंत्री अजित पवारांच्या हस्ते या विविध विकास कामांचे भूमिपूजन होणार होते."नवा विकसित बीड जिल्हा आपल्याला घडवायचाय" अजित दादा पवार सारखे म्हणायचे. बीड जिल्ह्याला विनाकारण बदनाम करणाऱ्यांना दादा विकास कामाने उत्तर देणारे होतो. अजित दादांचे बीड जिल्हा सर्वांगीण विकासाचे स्वप्न अपुरेच राहिले. मला अजित दादांच्या हस्ते २०२३ मध्ये अंमळनेर जि.जळगाव येथे ग्रंथालय चळवळीतील कार्याबद्दल राज्यस्तरीय "खा.शरदचंद्र पवार ग्रंथमित्र पुरस्कार "स्विकारण्याचे भाग्य माझ्या वाट्याला आले. दादांच्या सहवासाची ही अविस्मरणीय आठवण कायम राहिल. बारामती-पिंपरी चिंचवड सारखा विकास बीड जिल्ह्याचा करण्याचा हे अजित पवारांचे स्वप्न त्यांच्या अकाली निधनाने अपूर्ण राहिले. जिल्ह्यातील तमाम स्व.अजित दादा वर निस्सीम प्रेम करणारी जनता आता स्व. अजित दादा यांचे बीड जिल्हा विकासाचे स्वप्न उपमुख्यमंत्री व जिल्ह्याच्या पालकमंत्री ना.श्रीमती सुनेत्राताई अजित पवार यांच्या माध्यमातून पुर्ण होण्याची अपेक्षा करत आहेत. स्व.अजित दादा पवार यांना हिच खरी भावपूर्ण श्रद्धांजली असेल....

**लेखक**
**डॉ.राजेंद्र मुरलीधर सानप**
**सदस्य,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ.**
**इंद्रप्रस्थ कॉलनी बीड. मो.नं.- ९४२००१९५९७**